रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १७ ◆ अंक १४७
www.ramprahar.com

शुक्रवार, १३ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

बांगलादेशी तरुणींचे वास्तव्य; एक जण अटकेत/३
नवी मुंबईत प्लास्टिकविरोधी कारवाई तीव्र/६
'आरडीसीए'च्या क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ/८

## भारताचा बुद्धीबळपटू डी गुकेश नवा विश्वविजेता!



**नवी दिल्ली** : भारताचा बुद्धीबळपटू दोम्माराजू गुकेशने विश्वविजेता होण्याचा बहुमान पटकावला आहे. १८वर्षीय गुकेशने जागतिक अजिंक्यपद बुद्धीबळ स्पर्धेत जगज्ञेता डिंग लिरेनचे आव्हान मोडून काढत इतिहास घडवला. आतापर्यंतच्या १३ डावांपैकी ३२वर्षीय लिरेनने पहिला डाव जिंकला होता. यानंतर गुकेशने तिसरा डाव जिंकून बरोबरी साधली. त्यानंतर दोन्ही ग्रँडमास्टर्सनी सलग सात डाव बरोबरीत सोडवले होते. ११व्या डावात गुकेशने विजय मिळवून बरोबरीची कोंडी सोडवली. १२व्या डावात लिरेनने बाजी मारली. अखेरचा डाव कोण जिंकणार की हा मुकाबला टायब्रेकरमध्ये जाणार याकडे चाहत्यांचे लक्ष होते. गुकेशने दमदार खेळ करत विश्वविजेता होण्याचा मान पटकावला. सगळ्यात लहान वयाचा विश्वविजेता होण्याचा विक्रम आता गुकेशच्या नावावर नोंदला गेला आहे.


# एक देश, एक निवडणूक!

## केंद्रीय मंत्रिमंडळाची विधेयकाला मंजुरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशात एक देश, एक निवडणूक हे धोरण राबविण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने सप्टेंबर महिन्यात स्वीकारला. त्यानंतर गुरुवारी (दि. १२) मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली आहे. पुढील आठवड्यात हे विधेयक संसदेत सादर केले जाण्याची शक्यता आहे.

एक देश, एक निवडणूक पद्धत २०२८मध्ये अस्तित्वात आणण्यासाठी मोदी सरकारच्या वतीने प्रयत्न केले जाणार आहेत. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद समितीने १८ हजार पृष्ठांचा अहवाल तयार



केलेला आहे, ज्यावर २१ हजार दुरुस्त्या येऊन त्यापैकी ८० टक्के दुरुस्त्या या पद्धतीच्या बाजूने आहेत. या समितीचा ३७६ पृष्ठांचा संक्षिप्त अहवाल वेबसाईटवर उपलब्ध आहे.

संसदेत हे विधेयक मंजूर झाल्यास एक देश, एक निवडणूक धोरण पुढील लोकसभा निवडणुकीवेळी म्हणजे २०२९मध्ये राबविले जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी संसदेत घटनादुरुस्तीद्वारे ही प्रक्रिया राबवावी लागेल. देशभरात व्यापक चर्चा करून सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न केंद्र सरकारकडून केला जात आहे.

भाजपच्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये एक देश, एक निवडणुकीच्या आश्वासनाचा समावेश होता, शिवाय 'रालोआ ३.०' सरकारच्या पहिल्या १०० दिवसांच्या लक्ष्यपूर्तीमध्येही हे धोरण समाविष्ट करण्यात आले होते. सरकारने मंगळवारी (१७ सप्टेंबर) १०० दिवस पूर्ण केले असून त्याच्या दुसऱ्याच दिवशी केंद्रीय मंत्रिमंडळाने कोविंद अहवालाला मंजुरी दिली होती.

'रालोआ' सरकारमधील प्रमुख दोन घटक पक्ष जनता दल (संयुक्त) आणि तेलुगु देसम पार्टी (टीडीपी) यांनी एक देश, एक निवडणूक धोरणाला आधीच पाठिंबा दिला आहे.

देशात विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या वेळी विधानसभेची निवडणूक होत असल्याने दरवर्षी कुठल्या ना कुठल्या राज्यामध्ये निवडणुका होतात. त्यासाठी आचारसंहिता लागू करावी लागते. त्यामुळे विकासाची गती मंदावते. एकाच वेळी निवडणुका होत असल्याने पैशांचा अपव्यय कमी होतो, काळ्या पैशांवर नियंत्रण येते, विकासाची गती कायम राहते. त्यामुळे हे धोरण राबवणे काळाची गरज असून २०४७मध्ये देशाला विकसित करण्याच्या धोरणाचाच हा भाग आहे.

# मंत्रिपदांचा फॉर्म्युला ठरलाय!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आमच्या पक्षाचे मंत्री कोण असतील याचा निर्णय आमचे संसदीय मंडळ, नेते घेतात. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि मी आमच्या नेत्यांची भेट घेतली. मंत्रिपदांबाबत चर्चाही केली आहे. प्रत्येक विभागातून कोण मंत्रिपदाचे उमेदवार असू शकतात, कुणाला आपण बनवू शकतो अशी एक यादी आम्ही तयार केली आहे. आता वरिष्ठ स्तरावर ते निर्णय घेतील आणि आम्हाला कळवतील. मंत्रीपद वाटपाचा फॉर्म्युला ठरलाय. तुम्हाला लवकरच कळेल, असे सूचक विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.



### 'पंतप्रधान मोदींचे महाराष्ट्राला पूर्ण सहकार्य'

पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत झालेल्या भेटीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, पंतप्रधानांशी माझी प्रदीर्घ चर्चा झाली. मी त्यांचे आशीर्वाद घेतले. त्या वेळी महाराष्ट्रासंदर्भात आमची काही चर्चाही झाली आहे. पंतप्रधानांनी मला सांगितलय की, महाराष्ट्र देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे राज्य आहे. या राज्याला गतीशील ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. त्या दृष्टीने पंतप्रधान महाराष्ट्राला पूर्ण सहकार्य द्यायला तयार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दोन दिवसीय दिल्ली दौऱ्यावर आहेत. त्यांनी गुरुवारी (दि. १२) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीनंतर माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, ज्या वेळी आपण पहिल्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतो तेव्हा राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान यांची भेट घ्यायची असते; त्याप्रमाणे मी त्यांची भेट घेतली.

पंतप्रधान मोदी आमच्या पक्षाचे सर्वोच्च नेते आहेत. त्यासोबत ते पालकाच्या भूमिकेत असतात, आम्हाला मार्गदर्शन करतात. २०१४ साली त्यांनी त्यांच्या प्रचाराची सुरुवात रायगडावर येऊन छत्रपती शिवाजी महाराजांना नमन करून केली होती. शिवरायांबद्दल त्यांच्या मनात प्रचंड श्रद्धा आहे. महाराजांनी दाखवलेल्या मार्गावर ते चालण्याचा प्रयत्न करतात, म्हणून मी महाराजांची मूर्ती त्यांना भेट दिली, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

याशिवाय मी पक्षाचे प्रमुख लोक अध्यक्ष जे.पी. नड्डा, गृहमंत्री अमित शाह, नितीन गडकरी, राजनाथ सिंह यांचीही सदिच्छा भेट घेतली. रात्री नड्डा, शाह आणि पक्षाचे बी.एल संतोष या नेत्यांसोबत मंत्रिमंडळ विस्ताराबाबत चर्चा झाली आहे. राष्ट्रपतींनी महाराष्ट्रात यावे यासाठी मी निमंत्रित केले आहे. लवकरच त्या महाराष्ट्र दौऱ्यावर येतील, असेही उपमुख्यमंत्री फडणवीसांनी म्हणाले.

मी माझ्या पक्षातील नेत्यांच्या भेटी घ्यायला मी आलोय. माझी आणि अजित पवारांची दिल्लीत भेट झालेली नाही. ते त्यांच्या कामाने आणि मी माझ्या कामाने दिल्लीत आलोय. एकनाथ शिंदेंचे काही काम नसल्याने ते आले नाहीत. शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्या पक्षाचे मंत्री कोण असतील ते शिंदे आणि अजितदादा ठरवतील. आमच्या पक्षाचे मंत्री कोण असतील त्याचा निर्णय भाजप संसदीय समिती ठरवते. मंत्रिपदाचे सक्षम उमेदवार कोण असतील ते वरिष्ठ ठरवतील आणि आम्हाला सांगतील. मंत्रिमंडळ विस्ताराचा कुठलाही तिढा नाही, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## पनवेल मनपा हद्दीतील विनापरवानगी आठवडे बाजार, अनधिकृत हातगाड्यांवर कारवाई करा

■ आमदार प्रशांत ठाकूर यांची आयुक्तांकडे मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील विनापरवानगी आठवडे बाजार आणि अनधिकृत हातगाड्यांवर कारवाई करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे गुरुवारी (दि. १२) केली. या संदर्भात त्यांनी आयुक्तांना निवेदनही दिले. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी स्थायी समिती सभापती अमर पाटील उपस्थित होते.

पनवेल महापालिका हद्दीत ठिकठिकाणी आठवडे बाजार चालतात. हे आठवडे बाजार कोणत्याही अधिकृत परवानग्या न घेता काही लोकांच्या दादागिरीने अवैधपणे चालविले जात असल्याचे व काही अधिकारी याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले असून स्थानिक नागरिकांकडून तसेच बाकीच्या अधिकृत व्यावसायिकांकडून तक्रारी येत आहेत. त्याचप्रमाणे अवैधपणे कोणतीही परवानगी अथवा परवाना न घेता रस्त्यावर हातगाड्यांवर धंदे करीत आहेत. **(पान २ वर..)**

## 'एनआयए'चे छापे; दोन जण ताब्यात

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) देशभरात मोठी कारवाई केली आहे. दहशतवादी संघटनांशी संबंध असल्याच्या संशयातून गुरुवारी (दि. १२) पाच राज्यातील १९ ठिकाणी छापे टाकले. यामध्ये महाराष्ट्रात एनआयए आणि राज्य दहशतवादविरोधी पथकाने कारवाई केली. अमरावतीनंतर भिवंडीतूनही एकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदशी व्यक्तींच्या अतिरेकी संबंधांच्या प्रकरणाच्या चालू असलेल्या तपासाचा हा एक भाग आहे. भिवंडी शहरालगतच्या खोणी खाडीपार ग्रामपंचायत परिसरात एनआयएने कारवाई केली. कामरान अन्सारी (वय ४५) असे ताब्यात घेतलेल्या संशयिताचे नाव आहे.

## निवडक

### छत्तीसगडमध्ये चकमकीत सात नक्षलवाद्यांचा खात्मा

**दंतेवाडा** : छत्तीसगडच्या नारायणपूर जिल्ह्यातील दक्षिण अबुझमद येथे गुरुवारी (दि. १२) पहाटे ३च्या सुमारास नक्षलवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाली. नक्षलवाद्यांच्या गोळीबाराला पोलीस जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले. यामध्ये सात नक्षलवादी ठार झाले आहेत. दंतेवाडाचे पोलीस अधीक्षक गौरव राय यांनी याला दुजोरा दिला. त्यानंतरही दोन्ही बाजूने गोळीबार सुरू होता.

### आंगणेवाडीतील भराडीदेवीची प्रसिद्ध यात्रा २२ फेब्रुवारीला

**मालवण** : दक्षिण कोकणची काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या आंगणेवाडीच्या यात्रेची तारीख ठरलीये. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी मालवण तालुक्यातील आंगणेवाडीमध्ये भराडीदेवीची यात्रा होणार आहे. दरवर्षी देवीला कौल लावून या जत्रेची तारीख ठरवली जाते. या यात्रेला मुंबईतून मोठ्या संख्येने चाकरमानी दाखल होतात. त्यासोबतच विविध पक्षांचे राजकीय नेते सहभागी होत असतात.





## विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळातही प्राविण्य मिळवावे

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळातही प्राविण्य मिळवले पाहिजे आणि आपल्या तालुक्याचे, जिल्ह्याचे नाव मोठे केले पाहिजे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गुरुवारी (दि. १२) केले.

पनवेल पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने तालुकास्तरीय क्रीडा आणि व्यक्तिमत्व विकास स्पर्धेचे आयोजन तालुक्यातील नेवाळी येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

उद्घाटन समारंभाला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर, सहाय्यक गटविकास अधिकारी पांढरे, संजय चौधरी, सीताराम मोहिते, विश्वास काथारा, स्वप्नील ठाकूर, विस्तारक अधिकारी, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक आणि तालुक्यातून आलेले खेळाडू उपस्थित होते. या स्पर्धेसाठी विश्वास काथारा यांच्याकडून विशेष सहकार्य लाभल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

विद्यार्थ्यांना देशी खेळांसाठी उत्तेजन आणि ग्रामीण भागातील खेळाडूंना व्यासपीठ मिळावे याकरिता या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये बेचकीने नेम धरणे, लगोरी, दोरी उड्या, लंगडी या क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. या वेळी मान्यवरांनीही मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## पाचाड येथील शिवसृष्टी उभारणीच्या प्रकल्पाला गती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

किल्ले रायगडाच्या पायथ्याशी शिवसृष्टी उभारण्याच्या प्रकल्पाला गती मिळणार आहे. प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून तो मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठवला जाणार आहे. सरकारच्या मंजुरीनंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

राज्यात विवीध ठिकाणी उभारण्यात आलेल्या शिवसृष्टींचा अभ्यास करून या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आला, ज्याचे सादरीकरण नुकत्याच झालेल्या रायगड प्राधिकरणाच्या बैठकीत करण्यात आले. यानंतर शिवसृष्टीचा आराखडा अंतिम मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. तो मंजूर झाल्यावर शिवसृष्टीच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.



> **रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शिवसृष्टी उभारण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. यासाठीचा आराखडा राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवला जाणार आहे.**
> **-डॉ. रवींद्र शेळके, उपजिल्हाधिकारी, सामान्य प्रशासन, रायगड**

किल्ल्यांचा इतिहास जिवंत करून दाखविण्यासाठी शिवसृष्टी तयार करणे, रायगड किल्ल्यावर प्राचीन वास्तूंचे संवर्धन, शास्त्रयुक्त पद्धतीने डेब्रिज काढणे व उत्खननातील प्राचीन इमारतीचे संवर्धन करणे, गडावर विविध ठिकाणी आधुनिक पद्धतीची स्वच्छतागृहे बांधणे, घनकचरा व्यवस्थापन, रायगड किल्ल्यावरील सर्व वस्तूंचे डॉक्युमेन्टेशन, हद्दीचे सीमांकन आदी कामांचा समावेश या आराखड्यात करण्यात आला आहे.

याचबरोबर रायगड किल्यावरील चित्त दरवाजा, नाणे दरवाजा, खुबलडा बुरूज, महादरवाजा आदींचे संवर्धन व जीर्णोद्धार करणे तसेच पर्यटक व शिवप्रेमींना रायगडावर पोहचण्यासाठी मजबूत पायवाटा निर्माण करणे, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी आदी महत्त्वाच्या सोयी उपलब्ध करून देणे, जलसंवर्धन करणे या बाबींचा समावेश आहे. याशिवाय पाचाड येथील राजमाता जिजाऊ समाधी व जिजामाता वाडा यांच्या संवर्धन व जीर्णोद्धाराचे कार्य तथा या ठिकाणी पर्यटकांसाठी आवश्यक सोयी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

### आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

*किल्ले रायगडाच्या पायथ्याशी शिवसृष्टी उभारण्यात येणार आहे. यासाठी ८० एकर जागेचे संपादन पूर्ण झाले आहे. ५० कोटींचा प्राथमिक निधी राज्य सरकारने दिला होता. त्यानुसार शिवसृष्टी उभारणीच्या कामांसाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ही शिवसृष्टी उभारण्यात येणार असून किल्ल्याचा तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या जाज्वल्य इतिहास या निमित्ताने किल्ल्यावर येणाऱ्या पर्यटकांना आणि शिवप्रेमींना अनुभवता येणार आहे.*

## नाताळ, थर्टी फर्स्टला कोकण, गोव्यासाठी विशेष रेल्वेगाड्या

**रोहा : प्रतिनिधी**

नाताळ, वर्षाअखेर व नववर्ष स्वागतासाठी कोकणात, गोव्याच्या किनारी, दक्षिण भारतात साजरा करण्याचे अनेकांचे नियोजन असते. या कालावधीतील गर्दी व प्रवाशांची मागणी लक्षात घेऊन मध्य आणि कोकण रेल्वे प्रशासनाने अतिरिक्त रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे.

मुंबई ते करमळी, कोचुवेली आणि पुणे ते करमळी दरम्यान ४८ विशेष रेल्वेगाड्या धावतील. सीएसएमटी-करमळी-सीएसएमटी दैनंदिन विशेष ३४ रेल्वेगाड्या धावतील. गाडी क्रमांक ०११५१ विशेष २० डिसेंबर ते ५ जानेवारीपर्यंत सीएसएमटी येथून दररोज रात्री १२.२० वाजता सुटेल आणि करमळी येथे त्याच दिवशी दुपारी १.३० वा. पोहचेल. गाडी क्रमांक ०११५२ विशेष २० डिसेंबर ते ५ जानेवारीपर्यंत करमळी येथून दररोज दुपारी २.१५ वा. सुटेल आणि सीएसएमटी येथे दुसऱ्या दिवशी रात्री ३.४५ वा. पोहचेल. या रेल्वेगाडीला दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ व थिवी येथे थांबे असतील. या रेल्वेगाडीला एक वातानुकूलित प्रथम श्रेणी, एक प्रथमसह द्वितीय वातानुकूलित, तीन द्वितीय वातानुकूलित, ११ तृतीय वातानुकूलित, दोन शयनयान, दोन सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन लगेजसह गार्ड्स ब्रेक व्हॅन असे डबे असतील.

एलटीटी-कोचुवेली-एलटीटी साप्ताहिक विशेष आठ रेल्वेगाड्या धावतील. गाडी क्रमांक ०१४६३ विशेष एलटीटी येथून १९ डिसेंबर ते ९ जानेवारीपर्यंत दर गुरुवारी



सायंकाळी ४ वा. सुटेल आणि कोचुवेली येथे दुसऱ्या दिवशी रात्री १०.४५ वा. पोहचेल. गाडी क्रमांक ०१४६४ विशेष २१ डिसेंबर ते ११ जानेवारीपर्यंत दर शनिवारी कोचुवेली येथून सायंकाळी ४.२० वा. सुटेल व एलटीटी येथे तिसऱ्या दिवशी १२.४५ वा. पोहचेल. या रेल्वेगाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवी, करमळी, मडगाव जंक्शन, कारवार, गोकर्ण रोड, कुमठा, मुर्डेश्वर, भटकळ, मूकनबिका रोड, बाय कुंदापुरा, उडुपी, सुरतकल, ठोकूर, मंगळुरू जंक्शन, कासारगोड, कन्नूर, कालिकत, तिरूर, शोरानूर, थ्रिसूर, एर्नाकुलम टाउन, कोट्टायम, तिरुवल्ला, चेंगन्नूर, मावेलिकारा, कायनकुलम व कोल्लम येथे थांबे असतील. या रेल्वेगाडीला दोन द्वितीय वातानुकूलित, सहा तृतीय वातानुकूलित, नऊ शयनयान, तीन सामान्य द्वितीय श्रेणी, एक सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड्स ब्रेक व्हॅन आणि एक जनरेटर व्हॅन असे डबे असतील.

पुणे-करमळी-पुणे साप्ताहिक विशेष सहा रेल्वेगाड्या धावतील. गाडी क्रमांक ०१४०८ विशेष रेल्वेगाडी २५ डिसेंबर ते ८ जानेवारीपर्यंत दर बुधवारी पहाटे ५.१० वा. पुणे येथून सुटेल आणि करमळी येथे त्याच दिवशी रात्री ८.२५ वा. पोहचेल. गाडी क्रमांक ०१४०८ विशेष रेल्वेगाडी २५ डिसेंबर ते ८ जानेवारीपर्यंत दर बुधवारी करमळी येथून रात्री १०.२० वाजता सुटेल आणि पुणे येथे दुसऱ्या दिवशी दुपारी १ वा. पोहचेल. या रेल्वेगाडीला चिंचवड, तळेगाव, लोणावळा, कल्याण, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड व थिवी येथे थांबे असतील. या गाडीला एक वातानुकूलित प्रथम श्रेणी, एक द्वितीय वातानुकूलित, दोन तृतीय वातानुकूलित, पाच शयनयान, सहा सामान्य द्वितीय श्रेणी व दोन लगेजसह गार्ड्स ब्रेक व्हॅन असतील.

या रेल्वेगाड्यांचे आरक्षण विशेष शुल्कासह १४ डिसेंबरपासून संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर व संकेतस्थळावर सुरू होईल.

## ना. अमित शाहांकडून खासदार शरद पवारांचे वाढदिवस अभीष्टचिंतन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांचा ८५वा वाढदिवस गुरुवारी (दि. १२) होता. वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खासदार पवारांची भेट घेतली होती. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीदेखील त्यांची भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

ना. अमित शाह यांचे ६ जनपथ निवासस्थानी खासदार सुप्रिया सुळे यांनी स्वागत केले. यानंतर ना. शाह आणि खासदार पवार यांची भेट झाली. या वेळी शाहांनी पुष्पगुच्छ देऊन पवारांचे अभीष्टचिंतन केले व शुभेच्छा दिल्या.

# परभणीतील परिस्थिती नियंत्रणात

## हिंसाचारानंतर चोख पोलीस बंदोबस्त तैनात

**परभणी : प्रतिनिधी**

परभणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान शिल्पाची तोडफोड झाल्यानंतर पुकारण्यात आलेल्या बंद आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. आंदोलकांचा मोठा जमाव, दगडफेक, जाळपोळ, पोलिसांचा आंदोलकांवर सौम्य लाठीचार्ज, जमावबंदी, इंटरनेट सेवा बंद अशा ताणलेल्या घटनांनंतर परभणीत गुरुवारी (दि.१२) परिस्थिती नियंत्रणात आली आहे.



जिल्हाभरामध्ये चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून बुधवारी रात्री उशिरापर्यंत दंगलखोर अशा धुडगूस घालणाऱ्या ४०पेक्षा जास्त लोकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मोठ्या प्रमाणावर व्यापाऱ्यांचे नुकसान झालेले आहे. या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर व्यापारी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत. स्वतः आयजी शहाजी उमप हे परभणीत थांबून आहेत. शहरातील परिस्थिती आता काहीशी बदलत आहे.

परभणी शहरात बुधवारी झालेल्या आंदोलनावेळी अनेक ठिकाणी तोडफोड झाली. वाहनांचे टायर जाळले गेले. जिल्हाधिकारी कार्यालयात खुर्च्यांची फेकाफेकी केली गेली. या घटनेमुळे पोलिसांकडून बळाचा वापर करण्यात आला. याप्रकरणी, घटनेसाठी जबाबदार असलेल्या ४० लोकांना ताब्यात घेण्यात आले असून वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असल्याची माहिती आयजी शहाजी उमाप यांनी दिली. परभणी शहरात सध्या जमाबंदी आहे, मात्र कोणतीही संचारबंदी नाही, परिस्थिती हाताळण्यासाठी संचार बंदीची आवश्यकता वाटत नाही, असेही उमाप यांनी स्पष्ट केले. SRPF शहरात बोलावण्यात आली आहे, संवेदनशील ठिकाणी आम्ही त्यांचा वापर करणार असल्याचेही शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले.

परभणी शहरात बुधवारी दुपारी झालेल्या हिंसक आंदोलनानंतर आता शांतता पसरली आहे. स्वतः नांदेड परिक्षेत्राचे आईजी शहाजी उमप परभणी ठाण मांडून असून परभणी शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

परभणी शहरासह जिल्हाभरात शांतता पसरली असून कुणीही कायदा हातात घेऊ नये, अस आवाहन स्वतः उमप यांनी केले. तसेच जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनीही परभणीकरांना शांततेचा आवाहन केले. महत्त्वाचे म्हणजे शहरात झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेशही जिल्हाधिकारी यांनी दिले असून आजपासून मनपा आणि तहसीलदार यांच्या वतीने हे पंचनामे केले जाणार आहेत.


# विविध शासकीय योजनेंतर्गत विहीरींच्या अनुदानात होणार वाढ

**रायगड : रामप्रहर वृत्त**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेत निकष सुधारून विहीर, वीज जोडणी, पंपसंच आदींसाठी वाढीव अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनुसुचित जाती, जमातींच्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून जीवनमान उंचावणे हा उद्देश समोर ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी कृषी विभाग, रायगड जिल्हा परिषद अलिबागमार्फत करण्यात आली आहे.

या योजनांतून शेतकऱ्यांना नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, पंपसंच आदी विविध घटकांसाठी अनुदान देण्यात येते. सन २०२४-२५ आर्थिक वर्षातील लाभार्थ्यांना घटकांच्या अनुदानात वाढीव लाभ देण्यात येणार आहे. त्यामध्ये योजनेंतर्गत विहीरींचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांना आता चार लाख रुपयांचे अनुदान मिळणार आहे. इतर बाबीसाठी दुप्पट अनुदान वाढविले आहे.



त्यामध्ये विहीर दुरुस्ती एक लाख, सतत प्लास्टीक अस्तरीकरण दोन लाख रुपये, इनवेल बोअर ४० हजार रुपये, वीज जोडणी आकार २० हजार रुपये, पंपसंच ४० हजार रुपये, तुषार सिंचन ४७ हजार रुपये, ठिबक सिंचन ९७ हजार रुपये, यंत्रसामुग्री ५० हजार रुपये, पिकीसी/एचडीपीई पाईप ५० हजार रुपये, परसबागेसाठी पाच हजार रुपये, विंधन विहिरींसाठी ५० हजार रुपये अनुदान केले आहे.

त्यामध्ये पूर्वी असलेली १,५०,००० रुपये उत्पन्नाची अट काढून टाकण्यात आली आहे व नवीन विहीरींसाठी असणारी १२ मी खोलीची व दोन सिंचन विहीरीमधील ५०० फूट अंतराची अटसुद्धा रद्द करण्यात आली आहे.

या योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांचे पात्रता निकष जारी करण्यात आले आहेत जसे अर्जदार अनुसूचित जाती/नवबौद्ध/अनुसुचित जमाती प्रवर्गातील असावा. त्यासाठी जातीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८अ उतारा असणे आवश्यक आहे. जमीनधारणा ०.४० हे, ते ६.०० हे. पर्यंत मर्यादित असावी.

शेतकऱ्यांनी वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी महा-डीबीटी पोर्टलचे http://mahadbt.maharashtra.gov.in/farmer/Login या संकेतस्थळावर अर्ज दाखल करावा. या योजनेतंर्गत ऑनलाईन अर्ज स्वीकृतीपासून लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्याची सुविधा पोर्टलद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे. एकत्रित संगणकिय सोडत पद्धतीने लाभार्थी निवडण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा व अधिक माहितीसाठी तालुकास्तरावरील पंचायत समितीच्या कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

# स्वच्छ शौचालय मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक शौचालय दिन २०२४चे औचित्य साधून केंद्रीय गृहनिर्माण आणि नगर विकास मंत्रालयाने येत्या २५ डिसेंबर २०२४ पर्यंत देशव्यापी 'स्वच्छ शौचालय मोहीम' राबविण्यात येत असून, पनवेल महानगरपालिकेने या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला आहे.

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या नेतृत्वाखाली उपायुक्त डॉ. वैभव विधाते व सहाय्यक आयुक्त डॉ.रूपाली माने यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्वच्छ शौचालय मोहीम यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनीदेखील स्वच्छ आणि कार्यरत सामुदायिक व सार्वजनिक शौचालये साकारण्यास पुढाकार घेत या स्वच्छ शौचालय मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन पनवेल महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालयांचे परिचालन प्रभावी प्रद्धतीने करणे, शौचालयांमध्ये आवश्यक सुविधा पुरवणे, सर्व सार्वजनिक आणि सामुदायिक पातळीवरील शौचालयांची स्वच्छता आणि देखभाल करणे, शौचालयामध्ये नागरिकांचा प्रतिसाद नोंदवण्यासाठी क्यूआर कोड किंवा फीडबॅकमशीन बसवणे, शौचालयाचा एकूण वापर नोंदवणे अशा विविध गोष्टींमध्ये या मोहिमेमध्ये समावेश आहे. शौचालयांची स्वच्छता, शौचालयांमध्ये प्रवेशाची सहज उपलब्धता तसेच शौचालये प्रभावीपणे कार्यक्षम बनविण्यावर या मोहिमेमध्ये भर दिला जात आहे, अशी मॉडेल सार्वजनिक शौचालये ओळखण्याच्या उद्देशाने, स्वच्छ शौचालय चॅलेंज (आव्हान) यामध्ये सुरू करण्यात आले आहे.

या अभियानात पनवेल मनपा सहभागी झाले असून, पनवेल शहरातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांच्या स्वच्छता व दुरुस्ती वर भर देण्यात आला आहे. पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य (स्वच्छता) विभागाच्या नेतृत्वाखालील या मोहिमेत स्थानिक रहिवासी, स्वयंसेवी संस्था, आध्यात्मिक संस्था, नागरिक संघ, स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता कर्मचारी आणि नागरी स्वयंसेवकांचा सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

महानगरपालिकेमार्फत सार्वजनिक शौचालये स्वच्छ राखण्याच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करणे, नागरिकांना शौचालयाच्या स्वच्छतेच्या योग्य पद्धतींबद्दल शिक्षित करणे आणि पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांमधील सुविधा उच्च स्वच्छतेच्या मानकांची पूर्तता करतात याची खात्री करणे हे या उपक्रमाचे मुख्य लक्ष्य आहे.

**स्वच्छ शौचालय म्हणजे केवळ शौचालयाची स्वच्छता नाही, महानगरपालिकेने शौचालयाची दुरुस्ती केल्यानंतर किंवा आवश्यक सुविधा त्या शौचालयामध्ये दिल्यानंतर त्या सुविधांचा योग्य वापर करणे आणि शौचालय सुस्थितीत आणि कार्यरत ठेवण्यामध्ये महानगरपालिकेस सहकार्य करणे हेदेखील अपेक्षित आहे. या स्वच्छ शौचालय मोहिमेमध्ये सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांच्या अंतर्गत सुविधांची स्वच्छता राखणे व शौचालय सभोवतालची स्वच्छता राखण्यासाठी नागरिकांनी सक्रियपणे सहभागी व्हावे.**

**-आयुक्त मंगेश चितळे**
**पनवेल महानगरपालिका**

# चिरनेरमध्ये आजपासून दत्त जयंती सोहळा

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील कातळपाडा चिरनेर गावातील श्री दत्त जयंतीचा उत्सवाची संपूर्ण तयारी पूर्णत्वास आली आहे. शुक्रवार १३ डिसेंबर ते रविवार १५ डिसेंबर या तीन दिवसांच्या कालावधीदरम्यान चालणाऱ्या या दत्तजयंती उत्सव सोहळ्यात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यात १३ डिसेंबर रोजी सकाळी श्री दत्तगुरूंचा अभिषेक करण्यात येईल. त्यानंतर दुपारी १.०० वाजता दत्तगुरूंची ग्राम प्रदक्षिणा (भिक्षाफेरी)काढण्यात येईल. यात २१ गाव मुक्त सांप्रदाय अध्यात्मिक पौर्णिमा मंडळाचे वारकरी व कातळपाडा ग्रामस्थ सहभागी होणार आहेत. त्यानंतर रात्री सात वाजता दत्तगुरूंच्या भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ९.३० वाजता ह. भ. प. संदीप महाराज (पेण) यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होईल. शनिवारी दत्तजयंतीच्या जन्मोत्सवाच्या मुख्यदिवशी सकाळी सात वाजता, दत्तगुरूंचा महा अभिषेक व महापूजा होईल. त्यानंतर दुपारी साडेबारा वाजता, अभिषेक गावंड, सानिया म्हात्रे, सार्थ गावंड, सुरज पाटील, गिरीश भगत, संचित गावंड, अशितोष म्हात्रे या आवरे येथील स्वराभिषेक गायन कलामंचाच्या वतीने गायनाचे सुर ऐकायला मिळतील. त्यानंतर सायंकाळी चार ते सहा दरम्यान दत्तगुरूंच्या जन्म सोहळ्यानिमित्त दत्तजन्म किर्तन व दत्तजन्म सोहळा होईल.

या वेळी भक्ती वेदांत गोशाळा नतिवळी येथील कीर्तनकार ह भ प दिनेश महाराज मते यांचे दत्त जन्मोत्सवावर कीर्तन होईल. तदनंतर सात वाजता महाप्रसाद, रात्री पालखी मिरवणूक काढण्यात येईल. तर रविवारी, सायंकाळी चार वाजता श्री सत्यनारायणाच्या महापूजेचे आयोजन व रात्री आठ वाजता, महाराष्ट्राचे महागायक स्वर्गीय प्रल्हाद शिंदे यांच्या श्री स्वर प्रल्हादाचे, या प्रसिद्ध गायक चंद्रकांत प्रल्हाद शिंदे यांच्या भावगीतांच्या व भक्ती गीतांच्या कार्यक्रमाचा आनंद रसिक प्रेक्षकांना घेता येईल, अशी माहिती कातळपाडा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आली.

# जासई विद्यालयात प्रश्नमंजुषा स्पर्धा

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनी मार्फत उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये रायगड विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यालयाचे प्राचार्य एम.के. कोंगेरे यांनी प्रस्ताविक केले. प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील हे उपस्थित होते. विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन केले गेले.

रयतच्या रायगड विभागातील २४ शाळांचे संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते, दिवसभर या स्पर्धेच्या विविध फेऱ्या पार करून, या रायगड विभागीय पातळीवर प्रथम क्रमांक गव्हाण शाखा, द्वितीय क्रमांक वावंजे शाखा, तृतीय क्रमांक जासई शाखा आणि उत्तेजनार्थ उलवे शाखा यांनी यश संपादन केले.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विभागीय कार्यालयातील ओ.एस.गुजर, वैभव गावंड तसेच या स्पर्धेचे समन्वयक डी.सी.पाटील, परीक्षक टी.सी. म्हात्रे, सुहास नाईक, एस.एन. भाळे, गणेश भोईर, नरेश भगत, एम.एस. वाजेकर या पूर्ण टीमने मेहनत घेतली. विद्यालयातील सर्व सेवकांनी या स्पर्धेसाठी आलेल्या सर्व स्पर्धक विद्यार्थी, शिक्षक व पाहुण्यांची चहापान नाश्ता व भोजनाची व्यवस्था केले होती, विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे यांनी विद्यार्थ्यांना या जेवणासोबत गोड खाऊ दिला.

या कार्यक्रमासाठी स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य नरेश घरत, महाराष्ट्र रयत सेवक संघाचे समन्वयक नुरा शेख, आदित्य घरत आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी.जे. घरत व प्रा. अतुल पाटील यांनी केले.





**मुंबई : महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रिपदावर विराजमान झाल्यावर देवेंद्र फडणवीस यांची प्रसिद्ध उद्योजक सचिन मेहता यांनी भेट घेऊन अभिनंदन केले.**



**नागोठणे : पेण-सुधागड-रोहा मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा आमदार होण्याचा मान मिळविणारे आमदार रविशेठ पाटील यांचे भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष मारुती देवरे, रोहा तालुका क्रीडा संयोजक शेखर गोळे, भाजप कार्यकर्ते शुभम गुप्ता व अक्षय भिंगारे यांनी अभिनंदन केले.** (छाया : शामकांत नेरपगार)

# स्व. गोपीनाथ मुंडेंच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

भाजप नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष डॉ. राजेश पाटील आणि माजी नगरसेवक काशिनाथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जुईनगर येथील जनसंपर्क कार्यालय, येथे गोपीनाथ मुंडे यांची जयंती साजरी करण्यात आली.

या जयंतीचे औचित्य साधून प्रभागातील प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. राजा सुपर स्पेशालिटी आय केअर हॉस्पिटल यांच्या माध्यमातून नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी, चष्मे वाटप, अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच रक्ताच्या तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी डॉ. राजेश पाटील आणि काशिनाथ पाटील तसेच प्रभागातील नागरिकांनी गोपीनाथ मुंडे यांना जयंतीनिमित्ताने अभिवादन केले.



पान १ वरुन

# पनवेल मनपा हद्दीतील विनापरवानगी आठवडे बाजार, अनधिकृत हातगाड्यांवर कारवाई करा

या हातगाड्यांमुळे रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून हातगाड्यांवर व्यवसाय करणारे मोठ्या प्रमाणावर बांगलादेशी लोक असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत तसेच आठवडा बाजार व हातगाड्यांवर अनैतिक धंदे चालत असल्याच्या तक्रारीही येत आहेत.

नागरिकांकडून वेळोवेळी या संदर्भातील तकारी महापालिकेकडे करण्यात आल्या आहेत, परंतु महापालिका अधिकाऱ्यांकडून त्यांच्या तक्रारीला केराची टोपली दाखविली जात असल्याची भावना नागरिकांमध्ये झाली असल्याचेही या वेळी नमूद करण्यात आले. हे विनापरवानगी आठवडे बाजार व अवैधपणे चालणाऱ्या हातगाड्यांवर अतिशय संथगतीने कारवाई चालू आहे. ती कारवाई जलदगतीने पूर्ण करण्याची गरज आहे. ही बाब लक्षात घेता कोणाच्याही दबावाला बळी न पडता आठवडे बाजार व हातगाड्यांवर पूर्णपणाने कारवाई करावी; अन्यथा १ जानेवारी २०२५पासून महापालिकेच्या विरोधात व्यापक आंदोलन करणार असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधोरेखित केले.

# विना परवाना चालणाऱ्या लॉजवर कारवाईसाठी आज आंदोलन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे नाका येथे विना परवाना चालणाऱ्या विनायक रेसिडेन्सी या लॉज आणि बोर्डिंगवर कारवाई करावी यासाठी शुक्रवारी धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे रिपब्लिकन सेनेचे माजी जिल्हा अध्यक्ष खव्वाजमियाँ पटेल यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्त यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

नवी मुंबई पोलिसांना दिलेल्या निवेदनात खव्वाजामियाँ पटेल यांनी म्हंटले आहे की, मागील ११ महिन्यापासून मस्जिद अँड मदरसा दारूस सलामच्या भिंतीला चिटकून विनापरवाना अनधिकृतपणे विनायक रेसिडेन्सी नावाने लॉजिंग अँड बोर्डिंग चा व्यवसाय चालू आहे. लॉजिंग बंद करावे यासाठी पोलिसात तक्रारी करूनही त्या तक्रारीचे निवारण अद्यापही न झाल्यामुळे शुक्रवारी १३ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता रिलायन्स विनायक रेसिडेन्सी (लॉजिंग अँड बोर्डिंग) समोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

या संबंधित स्थानिक पोलीस, विभागीय अधिकारी व नवी मुंबई महापालिकाला पत्र दिले आहे, मात्र संबंधित अधिकारी हे अनाधिकृतपणे विनापरवाना व्यवसाय करीत असणाऱ्या वर कारवाई न करता अनाधिकृत बांधकाम केले असल्याचे एमआयडीसी, कार्यकारी अभियंता यांना लेखी तक्रार दिल्याची प्रत रवाना केली आहे.

येथील अनधिकृतपणे विनापरवाना व्यवसाय करीत असलेल्यावर काहीही कारवाई करीत नसल्याचे निदर्शनास आलेले असल्याचे पटेल यांनी सांगितले.


# पनवेल शहर पोलिसांकडून दोन आरोपींना अटक

**पनवेल :** बनावट जॉब ऑफर लेटर आणि जॉईन लेटर बनवून खोटे शिकके मारून दोन कोटी ७१ लाख ५० हजारची फसवणूक करणाऱ्या दोन आरोपींना पनवेल शहर पोलिसांनी घणसोली येथून अटक केली. सौनक भास्कर चौधरी आणि आरुषी दोशी अशी दोघांची नावे आहेत. यातील एक आरोपी फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. दोघांना न्यायालयात हजर केले असता ११ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे

शंतनु संदीप म्हात्रे हे करावे गाव, सीवूड येथे राहत असून आरोपी सौनक चौधरी याची पत्नी आरुषी दोशी आणि वडील भास्कर चौधरी यांनी संगणमताने आरबीआय आरटीआर, महाराष्ट्र शासन परिवहन विभाग, बँक स्टेटमेंट, बनावट जॉब ऑफर लेटर आणि जॉइनिंग लेटर बनवून त्यावर खोटे शिक्के मारले आणि सर्व बनावट दस्तऐवज खरे असल्याचे भासवून एप्रिल २०२३ ते ऑगस्ट २०२४ दरम्यान शंतनू म्हात्रे आणि त्यांच्या कुटुंबाची एकूण दोन कोटी ७१ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केली. गुन्हा दाखल झाल्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली.

## दुखवटा

### अरुणा शहासने



**नागोठणे :** प्रसिद्ध व्यापारी काळण समाजाचे नेते दिलीप महादेव शहासने यांच्या पत्नी अरुणा दिलीप शहासने यांचे वयाच्या ६७व्या वर्षी बुधवारी (दि.११) निधन झाले. त्यांच्या यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सुन, जावई व एक नात, एक नातू असा परिवार आहे. कै. अरुणा शहासने यांची दशक्रिया विधी शुक्रवारी (दि.२०) उद्धर (पाली) व उत्तरकार्य सोमवारी (दि.२३) राहत्या घरी होणार आहे.

### संजय खरोटे



**नवी मुंबई :** नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाचे अध्यक्ष, तसेच शिल्पकार, समाजभूषण संजय गजानन खरोटे यांचे ५ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन भाऊ, दोन मुले, एक पुतण्या, सुना, बहिण, मामा, भाचे, नातवंडे असा परिवार आहे. कै. संजय खरोटे यांचे गंधमुक्त उत्तरकार्य सोमवारी (दि.१६) सकाळी १० वाजता केमिस्ट भवन, प्लॉट ४, सेक्टर ८, सानपाडा, नवी मुंबई येथे होणार आहे.

# अनधिकृत बांधकामांवर हातोडा

## पनवेल मनपा क्षेत्रात अतिक्रमण विभागातर्फे कारवाई



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्यावतीने प्रभाग समिती ब मनपा हद्दीतील अनधिकृत बांधकामांवर आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार बुधवारी (दि.११) अतिक्रमण तोडक कारवाई करण्यात आली.

या वेळी उपायुक्त रविकिरण घोडके, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, सुबोध ठाणेकर, अतिक्रमण विभाग प्रमुख सदाशिव कवठे, प्रभारी अधिक्षक अरविंद पाटील, कळंबोली प्रभागातील अतिक्रमण विभागाचे कर्मचारी, पोलिस विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

कळंबोली गावात परवानगी न घेता आरसीसी बांधकाम बांधण्यात आले होते. या अनधिकृत बांधकामांवरती पोलीस बंदोबस्तात तोडक कारवाई करण्यात आली. याचबरोबर खारघरमध्ये बेलपाडा गॅरेज लाईन परिसरात अनधिकृत उभारलेल्या गॅरेजच्या बोर्डवरती, गॅरेज बाहेरील अनधिकृत वाढवलेल्या शेडवरती तोडक कारवाई करण्यात आली. तसेच खारघरमधील सेक्टर १० मधील कोपरा रोड परिसरात रस्त्यांवर अनधिकृत उभारलेल्या चहाच्या टपाऱ्या, फूड स्टॉल्सवरती तोडक कारवाई करण्यात आली. सेक्टर १२ मध्ये अनधिकृतपणे उभारलेलल्या फ्रुट गाड्यांवरती महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई केली. नावडे उपविभागात तळोजे अनधिकृत मच्छी मार्केटवरती तोडक कारवाई करण्यात आली.

नवीन पनवेलमध्ये गणेश मार्केट बाहेरील रस्त्यांवर, फूटपाथवर अनधिकृतरित्या व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करून रस्ता पादचाऱ्यासाठी रस्ता मोकळा करण्यात आला.

**खारघरमध्ये रस्त्यांवर तसेच फूटपाथवर अनधिकृतरित्या व्यवसाय करणाऱ्यांवर प्रभाग अ अतिक्रमण विभागाच्यावतीने कडक कारवाई केली जात आहे. फेरीवाल्यांनी रस्त्यांवर अनधिकृत व्यवसाय करू नये; अन्यथा अतिक्रमणाविरोधी कारवाई अधिक तीव्र होईल.**
**–स्मिता काळे, सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग अ**

**चारही प्रभागांमध्ये बांधकाम करण्यासाठी महापालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगी न घेता बांधकाम केल्याचे निर्दशनास आल्यास त्या ते बांधकाम अनधिकृत बांधकाम समजून तोडले जाईल.**
**–रविकिरण घोडके, उपायुक्त पनवेल महानगरपालिका**

# घोसाळवाडीजवळ बांगलादेशी तरुणींचे वास्तव्य; एक जण अटकेत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील यश लॉज घोसाळवाडी येथे बांगलादेशी तरुणी रसायनी पोलिसांना आढळल्या असून यांना सहकार्य करणाऱ्याला पोलिसांनी अटक केली आहे.




याबाबत सविस्तर वृत्त असे की, घुसखोरी बांगलादेशी महिला या कोणत्याही वैध प्रवाशी कागदपत्राशिवाय किंवा भारत सरकारने अथवा भारतीय सिमेवरील नोंदणी अधिकाऱ्याने नेमून दिलेल्या मार्गाव्यतिरिक्त घूसखोरीच्या मार्गाने भारतीय सरहद्दीत प्रवेश करून अनधिकृतपणे मिळुन आल्या तसेच आरोपी शिवकुमार राजदेव यादव याने लॉज येथे त्या आल्याबाबत पोलिसांना कळविले नाही, म्हणून रसायनी पोलिसांनी त्याला अटक करून कारवाई केली.

यात १५०० रुपये किंमतीचा फातीमा खातुन अबू सहीद हौलादर हिचे अंगझडतीमध्ये सिल्वर रंगाचा विवो कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट मिळून आला, तर फातीमा खातून अबू सहीद होलादर हिचे अंगझडतीमध्ये ५०८० रुपयांत मिळून आलेली भारतीय चलनातील रोख रक्कम त्यामध्ये ५०० रुपये दराच्या आठ नोटा, २०० रुपये व १०० रुपये दराच्या सात नोटा, फातीमा खातून अबू सहीद हौलादरच्या ताब्यात बांगलादेशी चलनातील १० टक्का चलनातील एक नोट व बांगलादेशी चलनातील दोन टक्का चलनातील एक नोट तसेच बांगलादेशी चलनातील १०० टक्का चलनातील एक नोट आढळून आली. शिवाय १५०० रूपये किंमतीचा जाकीयॉ सूलताना उर्फ रीपा रब्बीउल इस्लाम मोरोल हिचे अंगझडतीमध्ये साधारण हिरवट रंगाचा रिअल मी कंपनीचा मोबाईल हॅन्डसट; त्यामध्ये एअरटेल कंपनीचा सिमकार्ड जूना असा ऐवज मिळाला तर दोन हजार रुपये किमतीचा शिवकुमार राजदेव यादव याचे अंगझडतीमध्ये साधारण हिरवट रंगाचा वन प्लस मोबाईल हॅन्डसेट मिळून आला.

याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात नियम १९५०चे कलम ३ सह ६ परकीय नागरिक आदेश १९४८चे परिच्छेद ३(१)(अ) परकिय नागरिक कायदा १९४६ चे कलम १४(अ)परकीय नागरिक आदेश १९७१ चे परिच्छेद २ अन्वये गुन्हा दाखल झाला असून

या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अंमलदार अलिबाग पोसई टी.आर. वाघमोडे नेमणूक विशेष बांगलादेशी पथक यांच्यासोबत पानपट्टे तपास करीत आहेत.



**पनवेल : भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दीपक पाटील यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, संतोष पाटील, अभय केणी आदी उपस्थित होते.**



**कळंबोली : भाजप मंडळतर्फे लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे भाजप कार्यालयात पूजन करून अभिवादन करण्यात आले.**

# विजेत्या गव्हाण संघाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

## ‘रयत’च्या विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धेतील यशाबद्दल कौतुक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत रायगड विभागीय स्तरावरील जासई येथे झालेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या गटाने प्रथम क्रमांक पटकावून अव्वल स्थान प्राप्त केल्याबद्दल विद्यालयाचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.

प्रश्नमंजुषा स्पर्धेसाठी गव्हाण विद्यालयाच्या दिक्षा रमेश वर्तक (दहावी ब), सारा वैभव घरत (नववी ब) व प्रतिक प्रशांत नाडे (नववी क) या विद्यार्थ्यांच्या गटाने या स्पर्धेत आपले अव्वल स्थान मिळविले.

‘रयत’च्या रायगड विभागाच्या वतीने विभागीय स्तरावरच्या या स्पर्धेत रायगड विभागातील २५ शाळांच्या संघांनी सहभाग नोंदवला. त्यात गव्हाणचा संघ अव्वल ठरला. विजेत्या स्पर्धकांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन शुभाशिर्वाद घेतले.

या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गव ठाकूर व प्राचार्या प्रणिता गोळे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर व प्रमोद कोळी, ज्युनिअर कॉलेजचे विभागाचे प्रमुख बाबुलाल पाटोळे, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, लेखनिक चंद्रकांत मढवी आदी उपस्थित होते.

# चिपळे गावामध्ये घनकचरा व्यवस्थापन करा; भाजपची मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिपळे येथील भाजप कार्यकर्त्यांनी चिपळे गावामध्ये घनकचरा व्यवस्थापन करण्यात यावे, अशी मागणी करीत चिपळे ग्रुपगामपंचायतीच्या ग्रामसेवकांकडे पत्रव्यवहार केला आहे.

पत्रात म्हटले आहे की, ग्रुप ग्रामपंचायत चिपळे हद्दीत भरपूर सदनिका अथवा इमारतींमधून (सर्व रहिवाशी सोसायटी)मधून वारंवार घनकचरा व्यवस्थापनासंबंधित भाजप चिपळे ग्रामपंचायत कार्यालयात तक्रारी येत आहेत. त्यानुसार या तक्रारींची दखल घेण्यात आली आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियोजन लवकरात लवकर करण्यात यावे व सर्व रहिवासी सोसायटी यांना अतिरिक्त भुरदंडा मधुन दिलासा देण्यात यावा, अशी मागणी ग्रामपंचायत प्रशासक वैदु मॅडम व ग्रामसेवक रेवनाथ ढेरे यांच्याकडे भाजप चिपळे यांच्याकडुन करण्यात आली.

निवेदन देतेवेळी भाजप जि.प. अध्यक्ष सुनील पाटील, भाजप युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, माजी सरपंच मुकेश फडके, रोशन पाटील, हनुमान फुलौर, राजेश फुलौर, गणेश फुलौर आदी उपस्थित होते.

**पत्रव्यवहार व पाठपुरावा**

भाजप नेहमीच नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी तत्पर असते. त्या अनुषंगाने घनकचऱ्याचा विषय तत्काळ मार्गी लावावा, अशा सुचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिल्या आहेत. त्यानुसार चिपळे भाजप कार्यकर्त्यांनी घनकचरा व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायतीकडे पत्रव्यवहार व पाठपुरावा केला आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाची इंडस्ट्रियल व्हिजिट




**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान व संगणक विभागातर्फे बुधवारी (दि.११) एक दिवसीय पुणे इंडस्ट्रियल व्हिजिटचे आयोजन केले होते.

या इंडस्ट्रियल व्हिजिटसाठी महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान तसेच संगणक शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उस्फुर्त असा प्रतिसाद दिला. या इंडस्ट्रियल व्हिजिट चा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना पुणे येथील एसटीपीआय आयटी कंपनीतील माहिती व्हावी तसेच भविष्यात त्यांना तेथे जॉब ची संधी उपलब्ध व्हावी हा होता. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या इंडस्ट्रियल व्हिजिटचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या व्हिजिटचे आयोजन प्रा. राजश्री म्हात्रे व प्रा. रिजवान मोमीन यांनी केले तसेच प्रा. महेश धायगुडे, प्रा. शुभम शर्मा, प्रा. स्नेहल भोसले, प्रा. गीतांजली ठाकूर, प्रा. सोनी पांडे, अनंत सावंत, प्रा. मनीषा शिलेदार व प्रा. हलीमा सादिया तसेच इतर सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

दरम्यान या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात.

# नृत्य स्पर्धेत सीकेटी विद्यालय द्वितीय



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विश्वज्योत हायस्कूल खारघरतर्फे आयोजित विश्वव्यापी इंटर स्कूल कल्चर अँड टेक्निकल फेस्ट २०२४ अंतर्गत नृत्य स्पर्धेत इयत्ता नववी व दहावी गटात नवीन पनवेलमधील सीकेटी इंग्रजी माध्यामिक विद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

या स्पर्धेत गायत्री योगेश महाडकर, श्रेया कोल्हापूर, अक्षया वर्तक, अदिती सावंत, स्वस्तिका भिसे, अदिती कौचे, योगेश्वरी शिंगाडे, मृण्मयी मिलिंद झावरे या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. विद्यार्थिनींना सर्टिफिकेट आणि ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. नृत्य प्रशिक्षण नृत्य शिक्षक राम सर यांनी दिले. विद्यालयातील शिक्षिका शशिकला पाटील यांनी या स्पर्धेबाबत विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

विद्यार्थिनींचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण आणि पर्यवेक्षिका निरजा मॅडम तसेच इतर सर्व शिक्षकांनी कौतुक केले. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# रस्ते दुभाजकांवर फुलझाडे

## पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सुशोभीकरण

**पनवेल : वार्ताहर**

रस्ते नीटनेटके असलेच पाहिजेत; याव्यतिरीक्त या रस्त्यांना दुभाजणारे रस्तेदेखील टापटीप असावीत या हेतूने पनवेल महानगरपालिकेने खारघर, कामोठे, कळंबोली आणि पनवेल शहरात रस्त्यावरील दुभाजके सुशोभित करण्याबरोबर विदेशी प्रजातीच्या फुलांच्या झाडांच्या लागवडीचा निर्णय घेतला आहे.



कमी पाण्यात अधिक टिकावदार आणि दिसायला सुंदर अशी ही फुलझाडे असणार आहेत. यापूर्वी सिडकोकडे असलेले रस्ते पालिकेकडे हस्तांतरित झाल्यानंतर पालिकेने या रस्त्याचे कॉक्रीटीकरण केले. त्यानंतर ओसाड पडलेले दुभाजकदेखील व्यवस्थित असावी या हेतुने पालिकेने तीन वर्षाच्या मुदतीसाठी जवळपास तीन कोटी ८४ लाख खर्चुन या दुभाजकांचे सुशोभीकरण केले जात आहे. विदेशाच्या धर्तीवर सुशोभीकरण असणार असुनही फुलझाडे रात्रीच्या वेळेला वाहनांचे प्रकाशदेखील दुसऱ्या बाजूच्या वाहनांवर पडण्यास मज्ञाव करणार आहेत.

या झाडांमध्ये पावडर पफ प्लांट, आलमंदा, पेंडून्स स्टुबेरी, हमेलिया, तगर मिनी, इक्सोरा सिंगापोरेन्सिस, वाडेलिया, ग्राबा पल्पल सिंगल फ्लॉवर, लार्ज फ्लॉवरिंग ट्री, दुरांता गोल्डन आणि थेवेटिया या फुल झाडांचा समावेश आहे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर या ठेकेदार कंपनी माध्यमातून हे काम केले जात आहे.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात पालक सभा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना बोलावून विद्यार्थ्यांची प्रगती, विद्यार्थ्यांची शिस्त, विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीचे प्रमाण याबाबत आढावा या सभेत घेण्यात आला.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पालक सभेत मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचा सत्र एक या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून त्यांच्या प्रगती पुस्तकांचे वितरण पालकांमध्ये करण्यात आले होते. यातून विद्यार्थ्यांची प्रगती कशी आहे हा आढावा पालकांसमोर घेण्यात आला इयत्ता आठवीच्या वर्गशिक्षिका विश्रांती म्हात्रे, इयत्ता नववीच्या वर्गशिक्षिका पल्लवी पवार व इयत्ता दहावीच्या वर्गशिक्षिका विशाखा गावंड यांनी आपल्या वर्गातील प्रगत व अप्रगत विद्यार्थ्यांची माहिती पालकांना दिली. अप्रगत विद्यार्थ्यांसाठी विद्यालयातून जे उपक्रम राबविले जातात त्या उपक्रमांची माहिती पालकांना सांगण्यात आली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांची शिस्त, त्यांच्या गैरहजेरीचे प्रमाण कमी व्हावे या दृष्टीने पालकांना मार्गदर्शन करण्यात आले.

या पालक सभेत शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य गणेश देवकर, माता पालक संघाच्या सदस्या समृद्धी अडसुळे, उपस्थित होत्या. सत्र एक परीक्षेमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांचे शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांनी विद्यालयातील विविध उपक्रम विद्यालयाने आत्तापर्यंत मिळालेले यश यावर्षी विद्यार्थ्यांसाठी नव्याने केलेल्या भौतिक सुविधा यांची माहिती पालकांना देऊन विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीचे प्रमाण कमी करावे, यासाठी पालकांना आवाहन केले.

## संपादकीय

# दुर्दशेला जबाबदार कोण?

मुंबईला सोन्याची अंडी देणारी कोंबडी मानून या महानगराची सत्ता आपल्याच हातात राहील एवढे एकच धोरण राबवणाऱ्या एका पक्षाच्या नेतृत्वाला कुर्ला येथील भीषण 'बेस्ट' बस अपघातानंतर काही प्रश्न विचारले जाण्याची गरज आहे. या दुर्दैवी घटनेत सात निरपराध मुंबईकरांचा जीव गेला आणि चाळीसहून अधिक लोक जखमी झाले आहेत.

**सर्वसामान्य मुंबईकर अतिशय सोशिक आहेच. वाट्टेल त्या गैरसोयी सहन करत आपल्या रोजीरोटीच्या मागे ऊरापोटीची धावाधाव रोजच्या रोज करायची हे जणु त्यांच्या पाचवीला पूजलेले. लोकल गाड्यांतून गुराढोरांप्रमाणे चेंगराचेंगरीत प्रवास करायचा नाही तर तास-तास उभे राहून 'बेस्ट'च्या बसची वाट पाहून अखेर लोंबकळत हव्या त्या ठिकाणी पोहचायचे. किंवा रिक्षा-टॅक्सीवाल्यांची अरेरावी सहन करायची. देशभरातून रोजगाराच्या शोधात येणाऱ्यांचे लोंढे मुकाट सामावून घेणाऱ्या या शहरातली वाढती गर्दी येथील वाहतूक व्यवस्थेवरील ताण वर्षानुवर्षे वाढवतच राहिली आहे. या अशा अवस्थेत 'बेस्ट' बसचा शहरातील सर्वसामान्यांना आधार होता तो या सेवेच्या किफायतशीर दरांमुळे. साधारण दोन दशकांपूर्वीपर्यंत 'बेस्ट' ही माफक दरात सुरक्षित प्रवास सेवा देणारी संस्था म्हणून नावाजलीही गेली होती, परंतु वर्षानुवर्षे मुंबईची सत्ता कवटाळून बसलेल्या पक्षाच्या नेतृत्वाने कंत्राटदारांची पद्धती 'बेस्ट' प्रशासनात आणून तिचे वाटोळे केले असे आता खेदाने म्हणावे लागते. मुंबईत कुर्ला येथे अलीकडेच 'बेस्ट' बसची जी भयानक दुर्घटना घडली त्यातून या सेवेची किती टोकाची दुरावस्था झाली आहे ते चव्हाट्यावर आले. कंत्राटावर नियुक्ती झालेल्या ड्रायव्हरच्या ताब्यात अलिकडेच इलेक्ट्रिक बस देण्यात आली होती हे त्या अपघाताच्या तपशीलातून समोर आले. अवजड वाहने चालवण्याचा अनुभव त्याच्याकडे असताना केवळ १० दिवसांचे प्रशिक्षण देऊन गर्दीच्या वेळी त्याच्या हाती इलेक्ट्रिक बस देण्यात आली होती. त्यात या चालकाने क्लचऐवजी ॲक्सिलरेटर दाबल्याने हा भीषण अपघात घडला असावा असेही म्हटले गेले आहे. या अपघातात त्या बसने तब्बल २१ मोटारगाड्यांना आणि एका हातगाडीला धडक दिली. बसमध्ये तांत्रिक बिघाड असल्याचे दावे त्या ड्रायव्हरच्या नातेवाईकांकडून नंतर करण्यात आले. बसचालक सध्या अटकेत असून न्यायालयाने त्याला २१ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. बेस्टकडे भाडेतत्वावरील म्हणजे कंत्राटी पद्धतीतील सुमारे २२०० गाड्या आहेत. या गाड्यांचे चालकही कंत्राटदारांचेच असल्याने त्यांच्या प्रशिक्षणाविषयीची माहिती बेस्टकडे नसते. एकंदरच बेस्टच्या परिवहन विभागाच्या दुर्दशेची कहाणी या अपघातामुळे चव्हाट्यावर आली आहे. बेस्टमध्ये २०१७-१८मध्ये खासगी कंत्राटदारांकडून भाडेतत्त्वावर गाड्या घेण्याचा निर्णय झाला. या गाड्या आणि त्यांचे चालक यांच्यावर बेस्ट प्रशासनाचा कोणताही अंकुश नाही. कर्मचाऱ्यांचे वेतन देणेही अवघड झालेल्या 'बेस्ट'ने खर्च कमी करण्यासाठी भाडेतत्त्वावरील बसगाड्यांचा निर्णय घेतला होता. या निर्णयामुळे बसगाड्यांच्या देखभालीवरचा व चालकांच्या पगारावरचा खर्च कमी झाला खरा, परंतु बेस्ट सेवेचा दर्जाही दिवसेंदिवस घसरत गेला. महसूल वाढत नसल्यामुळे बेस्टचा तोटा वाढतच गेला असून कंत्राटी पद्धतीचा हा निर्णय पूर्ण फसल्याचीच आता चर्चा आहे. स्वत:ला मुंबईचे कैवारी म्हणवणाऱ्यांनी वर्षानुवर्षे सत्ता तेवढी उपभोगली. त्यांच्या ताब्यातील या यंत्रणांच्या अपयशाबद्दल त्यांना जबाबदार का धरले जाऊ नये? मुंबई शहराच्या विकासासाठी, येथील सर्वसामान्यांच्या सोयीसुविधांसाठी त्यांनी इतक्या वर्षांत कोणते धोरण राबवले याचा हिशेब त्यांच्याकडे मागायलाच हवा.**

# कोट्यवधी रुपयांची पाणीपट्टी थकली

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्ह्यात कोट्यवधी रुपयांची पाणीपट्टी थकली आहे. थकीत पाणीपट्टी वसुलीबाबत औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) प्रयत्न करते, परंतु त्याला यश आलेले नाही. एकट्या अलिबाग तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांनी एमआयडीसीचे आतापर्यंत १७२ कोटी २९ लाख सहा हजार ६७८ रुपयांची पाणीपट्टी थकवली आहे. ती वसून कशी करायची हा प्रश्न एमआयडीसीला पडला आहे. थकबाकीबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना नोटीस दिल्या आहेत.

एमआयडीसीचा मूळ हेतू उद्योगांना पाणीपुरवठा करणे हा आहे. उद्योगांना पाणी दिल्यानंतर एमआयडीसी नागरिकांना पाणीपुरवठा करते. एमआयडीसीचे पाणी मिळत असल्यामुळे गावांमधील पाण्याच्या नैसर्गिक स्त्रोत दुर्लक्षित झाले. यातील पाणी अशुद्ध बनले. पाण्याचे नवे जलस्त्रोत निर्माण करण्याकडे स्थानिक प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे नागरिक हे एमआयडीसीच्या पिण्याच्या पाण्यावरच अवलंबून राहिले आहेत. अलिबाग तालुक्यात उद्योगांना पाणीपुरवठा करण्यासाठी एमआयडीसीने जलवाहिन्या टाकल्या आहेत. ज्या गावांमधून या जलवाहिन्या गेल्या आहेत त्या ग्रामपंचायतींना एमआयडीसी पाणी देत आहे. पाणी वापरले जाते, परंतु वापरलेल्या पाण्याची पाणीपट्टी मात्र भरली जात नाही. गेली अनेक वर्ष ग्रामपंचायतींनी एमआयडीसीच्या पाण्याची बिले थकवली आहेत.

अलिबाग तालुक्यातील अलिबाग नगर परिषद, पायलट योजनेंतर्गत जिल्हा परिषद अखत्यारीत पंचायत समिती, रेवस ग्रामीण पुरवठा १ आणि जलपाडा २, चेंढरे गाव यासह ४० ग्रामपंचायती हद्दीतील लाखो नागरिकांना एमआयडीसी अंतर्गत पाणीपुरवठा केला जात आहे. अलिबाग नगर परिषदेचे २७ कोटी ९४ लाख ७१ हजार ४७७ रुपये, पायलट योजनेतील ५२ कोटी ५९ लाख ९३ हजार ३३० रुपये, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंतर्गत योजनेत १३ कोटी ८३ लाख ७२ हजार ६२२ रुपये, ४० ग्रामपंचायतींकडे ७५ कोटी ६ लाख २१ हजार ८६४, नागोठणे एमआयडीसी परिसरातील दोन कोटी ८४ लाख ४७ हजार ३८५ अशी एकूण १७२ कोटी २९ लाख सहा हजार ६७८ रुपये इतकी थकबाकी बाकी आहे.

पोयनाड, बांधन, देहेन, चेढरे, आंबेपुर, कामार्ले, चरी, कुरूळ, खंडाळे, पहरुरपाडा, नागोठणे, शहाबाज, थळ, वाघोडे, वणी कडसुरे, वांगणी, वरवठणे, मेधा रेवोली, खिडकी, बेलकडे, काविर, वेश्वी, ढवर, वढाव खुर्द, मुणधानी, खानाव, थळ, नवेदर नवगाव, मान तर्फे झिराड, सोगाव, वाडगाव, नवेदरबेली, नवेदर नवगाव, ढवर, सहाणगोटी, सहाण, कोपर या ग्रामपंचायतींची पाणीपट्टी थकली आहे.

केंद्र शासनाने जल जीवन योजना सुरू केली आहे. रायगड जिल्ह्यात जल जीवन योजनेंतर्गत पाणी योजना राबवली जात आहे. जुने किंवा नवे जलस्त्रोत तयार करून ही योजना राबवली जाणे आवश्यक आहे. असे असताना एमआयडीसी जलवाहन्यांवरूनच ही योजना राबवली जात आहे. याबाबत एमआयडीसीची कोणतीही परवानगी घेतलेली नाही आहे. हे पाणी वापरले जाते त्याचीदेखील पाणीपट्टी भरले जात नाही.

नागरिक पणीपट्टी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे भरतात, पण ही पाणीपट्टी एमआयडीसीकडे भरली जात नाही. जर लोक पाणीपट्टी भरत असतील तर मग ही जमा झालेली रक्कम एमआयडीसीकडे का वळती केली जात नाही. या प्रश्नाचे उत्तर शोधले पाहिजे. जर लोक पाणीपट्टी भरत नसतील तर ती वसूल करण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची आहे. आपली जबाबदारी व्यवस्थित पार पार पाडायची नाही आणि त्याचे खापर मात्र दुसऱ्यावर फोडायचे हे उचित नाही. एमआयडीसीही उद्योगांना पाणीपुरवठा करते. त्यातून उरलेले पाणी ग्रामपंचातींना देते. त्याची पाणीपट्टी ग्रामपंचायतींनी भरलीच पाहिजे.

एमआयडीसी ज्या जलवाहिन्यांमधून पाणीपुरवठा करते त्यांना टॅब लावून पाणी चोरणारे लोक आहेत. त्यांच्यामुळे शेवटच्या गावापर्यंत पाणी जात नाही. या पाणी चोरांविरुद्धदेखील आवज उठवला पाहिजे. हे टॅब मारणारे कोण आहेत हे ग्रामपंचायत सरपंचांना माहीत आहे. टॅब मारून गरीबांचे पाणी चोरणाऱ्यांविरोधात मोर्चा काढण्याचे धाडसदेखील केव्हातरी ग्रामपंचायतींनी दाखवले पाहिजे. पाणीपट्टी भरणार नाही. टॅब मारणाऱ्यांविरोधात चकार शब्द काढायचा नाही आणि अधिकाऱ्यांना घेराव घालून त्यांच्या आया-बहिणींचा उद्धार करणार हे योग्य नाही. त्यापेक्षा लोकांना पाणीपट्टी भरण्याची सवय लावा. जमा झालेली पाणीपट्टी वेळेत भरा. बंगेलवाले, हॉटेलवाल्यांनी जे टॅब मारले आहेत त्यांना तो काढायला सांगा.

खरंतर प्रत्येक ग्रामपंचायतीची स्वतंत्र पाणीपुरवठा योजना असायला हवी. किमान जिथे शक्य आहे तेथे गावाची स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबवायला हवी. त्याची देखभाल दुरूस्तीची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपवली तर पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात तरी सुटेल.

# चतुरस्त्र अभिनेत्री स्मिता पाटील

भारतीय सिनेसृष्टीत अगदी कमी वयात देदीप्यमान कामगिरी करणारी अभिनेत्री म्हणजे स्मिता पाटील. स्मिता हे भारतीय चमचमत्या सिनेसृष्टीला पडलेलं सोनेरी स्वप्न होय. अगदी दूरदर्शन निवेदिका ते प्रसिद्ध अभिनेत्री असा त्यांचा प्रवास आहे. मराठी सिनेमाजगतातसोबतच हिंदी सिनेजगतात सर्वात कमी वयात सर्वात यशस्वी आणि तारका स्मिता पाटील होत्या. त्यांचा आज पुण्यस्मरण दिन.

अवघे ३१ वर्ष आयुष्य वाट्याला आलेल्या स्मिता पाटील यांनी या छोट्या इनिंगमध्येही भरभरुन कामगिरी केली. त्यांचा जन्म पुण्यात १९५५मध्ये झाला होता. महाराष्ट्रातील राजकारणी शिवाजीराव गिरधर पाटील आणि समाजसेविका विद्याताई पाटील यांच्या त्या कन्या. मूळ खान्देशातील शिरपूर येथील त्यांचे कुटुंब असून स्मिता यांनी बालपणापासून नाटकात काम केले होते.

स्मिता यांनी पुण्यातील रेणुका स्वरूप मेमोरियल माध्यमिक शाळेतून शिक्षण घेतले. नंतर बॉम्बे युनिव्हर्सिटीमध्ये साहित्याचा अभ्यास केला. त्या पुण्यातील स्थानिक थिएटर ग्रुप्समध्येदेखील सहभागी असायच्या आणि त्यांनी बराचसा काळ फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या कॅम्पसमध्ये घालवला. १९६९मध्ये त्या मुंबईकर झाल्या.



स्मिता यांनी त्यांच्या जेमतेम एक दशकभराच्या कारकिर्दीत ८०हून अधिक हिंदी, बंगाली, मराठी, गुजराती, मल्याळम् आणि कन्नड चित्रपटांमध्ये काम केले. त्यांचा विवाह अभिनेता राज बब्बर यांच्याशी झाला होता. त्यांना प्रतीक बब्बर हा मुलगा आहे. चित्रपट अभिनेता असून त्याने २००८मध्ये सिनेसृष्टीत पदार्पण केले आहे.

स्मिता पाटील यांनी श्याम बेनेगल यांच्या चरणदास चोर (१९७५) चित्रपटातून पदार्पण केले होते. स्मिता या त्या वेळी भारतीय सिनेमातील नवीन प्रवाहाची चळवळ असलेल्या समांतर सिनेमाची एक आघाडीची अभिनेत्री बनल्या होत्या. तरीही त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत अनेक मुख्य प्रवाहातील चित्रपटांमध्येही त्या दिसल्या. त्यांच्या अभिनयाची खूपवेळा प्रशंसा झाली आणि त्यांनी चित्रपटात उल्लेखनीय भूमिका साकारल्या.

चरणदास चोर, सामना, निशांत, मंथन, जैत रे जैत, भूमिका, सर्वसाक्षी, गमन, आक्रोश, चक्र, निमकहलाल, शक्ती, अर्थ, उंबरठा, मंडी, अर्धसत्य, मेरे साथ चल या चित्रपटात स्मिता पाटील यांनी उल्लेखनीय काम केले आहे. या चित्रपटातील त्यांच्या भूमिका अजरामर झाल्या आहेत.

अभिनयाव्यतिरिक्त स्मिता या सक्रिय स्त्रीवादी व मुंबईतील महिला केंद्राच्या सदस्य होत्या. महिलांच्या समस्यांच्या प्रगतीसाठी त्या मनापासून वचनबद्ध होत्या. पारंपारिक भारतीय समाजातील महिलांची भूमिका, त्यांची लैंगिकता आणि शहरी वातावरणात मध्यमवर्गीय महिलांना तोंड देत असलेल्या बदलांचा शोध घेणाऱ्या चित्रपटांमधून त्यांनी काम केले.

स्मिता पाटील यांच्या कारकिर्दीत त्यांना दोन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि एक फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. १०८५मध्ये स्मिता यांना अवघ्या वयाच्या तिसाव्या वर्षी पद्मश्री हा भारताच्या चौथा सर्वोच्च नागरी सन्मान त्यांना मिळाला होता. बाळंतपणाच्या गुंतागुंतीमुळे मुंबईत १३ डिसेंबर १९८६ रोजी त्यांचा मृत्यू झाला. **(साभार : इंटरनेट)**

## बदलते तंत्रज्ञान

# गुगलची 'ही' नवी चिप पाच मिनिटांत देईल उत्तर!

गुगलने क्वांटम कॉम्प्युटिंगमध्ये महत्त्वपूर्ण घोषणा केली. कंपनीने त्यांच्या विलो नावाची नेक्स्ट जनरेशन चिप लाँच केली आहे. या चिपचे नाव क्वांटम विलो चिप असे आहे.



कॅलिफोर्नियामधील सांता बार्बरा येथील कंपनीच्या क्वांटम लॅबमध्ये विकसित केलेली ही नवीन चिप केवळ पाच मिनिटांत कठीण गणिताविषयी समस्या सोडविण्यास तुमची मदत करेल, जी सोडविण्यासाठी जगातील सर्वांत वेगवान सुपर कॉम्प्युटरला कोट्यवधी वर्षे लागतील.


गुगलने याबद्दल सांगत एक ब्लॉगपोस्ट शेअर करीत लिहिले, विलोने पाच मिनिटांच्या आत स्टॅण्डर्ड बेंचमार्क कॉम्प्युटेशनमध्ये परफॉर्म करून दाखवलं. ज्याला आजच्या सर्वांत वेगवान सुपर कॉम्प्युटरपैकी एक १० सेप्टिलियन (म्हणजे १०२५) वर्षे (विश्वाच्या वयापेक्षा जास्त) लागतील.

मायक्रोसॉफ्टसारख्या इतर टेक लीडर्सप्रमाणे गुगलचे उद्दिष्ट सध्याच्या सिस्टीमच्या पलीकडे स्पीड (गती) प्राप्त करून संगणकीय क्षेत्रात क्रांती घडवून आणणे आहे. गुगलच्या क्वांटम विलो चिपद्वारे सोडविलेल्या समस्येचे कोणतेही त्वरित व्यावसायिक प्रयोग नसले तरी कंपनी आजच्या मशीन्सच्या व्याप्तीच्या पलीकडे असलेल्या औषध शोधण्यासाठी, बॅटरी तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेतील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी ही चिप मदत करील.

अनइनिशिएटेड लोकांसाठी क्वांटम चिप ही एक विशेष प्रकारची कॉम्प्युटर चिप आहे, जी क्वांटम मेकॅनिक्सची तत्त्वे अणूंसारख्या अत्यंत लहान कणांचे विज्ञान वापरण्यासाठी डिझाईन केलेली आहे. माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी 'बिट्स' (० किंवा १) वापरणाऱ्या नियमित चिप्सच्या विपरीत, क्वांटम चिप्स 'क्यूबिट्स' वापरतात, जे एकाच वेळी ०, १ किंवा दोन्ही असू शकतात. ही अनोखी क्षमता क्वांटम चिप्सना पारंपरिक संगणकांपेक्षा अधिक वेगाने समस्या, गणिते हाताळण्यास अनुमती देते.

गुगलची विलो चिप १०५ क्यूबिट्सने सुसज्ज आहे. ही चिप आता रिअल टाइममध्ये चुका दुरुस्त करू शकते. वास्तविक जगतातील वापरासाठी क्वांटम मशीन्स व्यावहारिक बनविण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. अशा प्रकारे हा एक असा आविष्कार आहे, ज्यामुळे कम्प्युटर क्षेत्रात नवी क्रांती होणार आहे.

# भाजप नेते स्व. मनोहर पर्रीकर



**निमित्त**

गोव्याचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री मनोहर पर्रिकर यांचा आजच्याच तारखेला १९५५मध्ये गोव्यातील म्हापसा येथे जन्म झाला होता. साधी राहणी व उच्च विचारसरणीचे मूर्तिमंत उदाहरण असलेले पर्रिकर सर्वांना नेहमी आपल्यातलेच एक वाटत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, भाजपचा सामान्य कार्यकर्ता, गोव्याचे मुख्यमंत्री ते देशाचे संरक्षणमंत्री असा पर्रिकर यांचा थक्क करणारा प्रवास होता. यशाची अनेक शिखरे गाठूनही त्यांनी त्यांच्यातला 'कॉमन मॅन' अखेरच्या श्वासापर्यंत जपला.

मनोहर पर्रिकर यांचे शालेय शिक्षण लोयोला हायस्कूलमध्ये झाले. १९७८मध्ये त्यांनी आयआयटी मुंबईतून इंजिनीअरिंगमध्ये पदवी मिळवली. राजकारणात येण्याआधी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे ते ओढले गेले. आरएसएसच्या उत्तर गोवा युनिटमध्ये ते सक्रिय होते. त्यानंतर त्यांनी पूर्णवेळ राजकारणात पाऊल ठेवले आणि कधीही मागे वळून पाहिले नाही. १९९१मध्ये उत्तर गोवा लोकसभा मतदारसंघातून ते निवडणुकीच्या आखाड्यात उतरले. त्यानंतर १९९४मध्ये त्यांनी पणजी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि दणदणीत विजय मिळवला. त्यानंतर या मतदारसंघातून सलग चारवेळा ते निवडून आले. गोव्याच्या राजकारणात याआधी अशी किमया कोणत्याही अन्य नेत्याला साधता आली नव्हती. २०००मध्ये पर्रिकर सर्वप्रथम मुख्यमंत्री झाले. सामान्य गोवेकरांचा मुख्यमंत्री अशी त्यांची प्रतिमा होती. ते स्कूटीवरून मुख्यमंत्री कार्यालयात जायचे. मुख्यमंत्री झाल्यानंतरही पर्रिकर पणजीतील शासकीय निवासस्थानी न राहता म्हापसा येथील वडिलोपार्जित घरात राहायचे. विशेष म्हणजे देशातील पहिले आयआयटी पदवीधर मुख्यमंत्री हा बहुमान पर्रिकर यांना मिळाला.

भाजपची गोव्यात संघटनात्मक पातळीवर बांधणी करून पक्षाला सत्तेपर्यंत पोहचवण्यात पर्रिकर यांचा सिंहाचा वाटा राहिला. जून २००२मध्ये गोवा विधानसभा बरखास्त करण्यात आल्यानंतर पुन्हा निवडणुका झाल्या आणि भाजपने सर्वात मोठा पक्ष म्हणून मुसंडी मारली. छोटे पक्ष आणि एका अपक्ष आमदाराच्या पाठिंब्याने पर्रिकर पुन्हा मुख्यमंत्री झाले. त्यानंतर पर्रिकर यांनी घट्ट पाय रोवले. २०१२च्या विधानसभा निवडणुकीआधी पर्रिकर यांनी जनसंपर्क यात्रा काढत जनतेशी संवाद साधला. या यात्रेचे फळ पर्रिकर आणि भाजपला मिळाले व २१ आमदारांसह पूर्ण बहुमतातले भाजपचे सरकार गोव्यात विराजमान झाले. निवडणुकीनंतर राज्यात पेट्रोलवरील व्हॅट हटवण्याचा महत्त्वाचा निर्णय पर्रिकर यांनी घेतला. त्यामुळे इतर राज्यांच्या तुलनेत गोव्यात ११ रुपयांनी स्वस्त पेट्रोल मिळू लागले. पर्रिकर यांच्या या निर्णयाची देशभरात चर्चा झाली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोव्हेंबर २०१४मध्ये पर्रिकर यांना गोव्यातून दिल्लीत पाचारण केले आणि त्यांच्या हाती देशाच्या संरक्षणमंत्रिपदाची जबाबदारी सोपवली. पर्रिकर यांच्याच कार्यकाळात उरी हल्ल्याचा बदला म्हणून सप्टेंबर २०१६मध्ये पाकव्याप्त काश्मीरमध्ये धडक देऊन भारतीय जवानांनी सर्जिकल स्ट्राइक घडवला. मार्च २०१७मध्ये पर्रिकर यांनी संरक्षण मंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि ते चौथ्यांदा गोव्याचे मुख्यमंत्री झाले. फेब्रुवारी २०१८मध्ये पर्रिकर यांना स्वादुपिंडाचा कॅन्सर असल्याचे निदान झाले आणि या आजाराशी चाललेली त्यांची झुंज अखेर थांबली. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**उरण : मातीच्या भांड्यांना शहरी भागातूनही वाढती मागणी आहे. त्यामुळे चिरनेरच्या कुंभारवाड्यात अशी भांडी घडवली जातात.**

## आरोग्य प्रहर

# चमकदार त्वचेसाठी घरच्या घरी करा उपाय

सोशल मीडियावर त्वचेशी संबंधित डीआयवाय हॅक आणि उपाय सांगितले जात असतात. त्यात त्वचेवर लावण्यासाठी आता कोणताही पदार्थ शिल्लक राहिलेला नाही, पण सध्या एक नवीन ट्रेंड सुरू झाला आहे आणि तो म्हणजे चेहऱ्यावरील टॅन काढण्यासाठी दही व कॉफीचे मिश्रण. याबद्दल जाणून घेऊया.



कंटेंट क्रिएटर ध्रुव सेठीने याबाबतचा व्हिडीओ शेअर केला आहे. किमान दोन ते तीन दिवस तरी हे करून पाहा असे व्हिडीओत सांगण्यात आले आहे.

या ट्रेंडबद्दल जाणून घेण्यासाठी नवी दिल्लीतील सौंदर्यशास्त्रज्ञ, त्वचातज्ज्ञ, अभिवृत एस्थेटिक्सचे डॉ. जतीन मित्तल यांच्याशी चर्चा केली. तेव्हा ते म्हणाले की, कॉफीिं दही हे घटक बहुतेकदा घरगुती उपायाद्वारे त्वचेची काळजी घेण्यासाठी वापरले जातात आणि ते काही प्रमाणात त्वचा उजळण्यास मदत करू शकतात.

कॉफी- कॉफीमध्ये अँटिऑक्सिडंट्स आणि कॅफिन असतात, जे रक्ताभिसरण सुधारण्यास आणि चेहऱ्यावरील सूज कमी करण्यास मदत करतात. त्यामुळे तुमची त्वचा उजळ आणि अधिक ताजेतवानी झाल्यासारखी दिसते. त्यात एक्सफोलिएटिंग गुणधर्मदेखील आहेत, जे मृत त्वचेच्या पेशी काढून टाकण्यास मदत करतात. त्यामुळे चेहरा अधिक तेजस्वी दिसतो.

दही- दही लॅक्टिक सिडने समृद्ध आहे; जे त्वचेला हळुवारपणे एक्सफोलिएट करण्यास मदत करते, त्वचेच्या मृत पेशी काढून टाकते आणि चेहरा अधिक उजळ करते. तसेच दह्यामध्ये मॉइश्चरायझिंग गुणधर्मदेखील आहेत; ज्यामुळे त्वचा मऊ आणि हायड्रेटेड वाटू शकते.

दही आणि कॉफीचे मिश्रण फिकट त्वचेच्या टोनसह त्वचेचा टोन हलका करू शकते (म्हणजे टॅन काढू शकते) हा दावा दिशाभूल करणारा आहे. कारण-त्वचेतील अशुद्धता काढून टाकल्याने त्वचा उजळ होण्यास मदत होते.

डॉक्टर जतीन यांच्या म्हणण्यानुसार दही आणि कॉफी यांच्या मिश्रणातून कोणतीही व्यक्ती मास्क बनवू शकते. आठवड्यातून एकदा किंवा दोनदा हा मास्क तुम्ही वापरू शकता. हा मास्क तुमच्या त्वचेचा पोत आणि कांती यानुसार तुमच्या चेहऱ्यावर चमक आणण्यास मदत करू शकतो, पण तुमच्या त्वचेचा प्रकार आणि तुमच्या वैयक्तिक प्रतिसादावर ते अवलंबून असते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# रोह्यात विकासकामे युद्धपातळीवर

## ■ आमदार आदिती तटकरेंकडून पाहणी व सूचना

**रोहे : प्रतिनिधी**



माजी मंत्री विद्यमान आमदार आदिती तटकरे यांनी रोह्यातील विविध विकास कामाची पाहणी केली. या वेळी त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सूचना ही दिल्या.

रोहा शहरातील नव्याने बांधण्यात येत असलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञान चा वापर करीत नाट्य रसिकांना पर्वणी ठरू शकणाऱ्या नाट्यगृहाचे पाहणी माजी मंत्री विद्यमान आमदार आदिती तटकरे यांनी केली. नाट्यगृहाचे काम युद्धपातळीवर सुरू असून त्याचे लवकरात लवकर लोकार्पण होणार आहे. या नाट्यगृहातील असानव्यवस्था, प्रवेशद्वार, पार्किंग, किचन यासह अन्य नाट्यगृहातील व्यवस्थेची पाहणी आदिती तटकरे यांनी या वेळी केली. उपस्थित अधिकाऱ्यांना सूचनाही दिल्या.

रोहा शहराचे प्रवेशद्वार व निसर्ग रम्य असलेले हनुमान टेकडी सुशोभीकरण कामाचे पाहणी आदिती तटकरे यांनी करीत उत्कृष्ट पद्धतीने व सुशोभनीय परिसर हा नजीकच्या काळात दिसणार आहे. त्या कामाची पाहणी या वेळी केली. यासह नव्याने बांधण्यात येत असलेल्या रोहाचे श्रद्धास्थान असलेले हनुमान मंदिराची ही पाहणी या वेळी आदिती तटकरे यांनी केली.

आदिती तटकरे यांच्यासमवेत रोहा नगर परिषद मुख्य अधिकारी अजय एडके, पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, माजी नगरसेवक महेश कोलाटकर, अहमद दर्जी, मयुर दिवेकर, आनंद कुलकर्णी, चंद्रकांत पार्टे, प्राजक्ता चव्हाण, महिला तालुकाध्यक्ष प्रीतम पाटील, अजित मोरे, नगर परिषदेचे ओंकार भुरण, ठेकेदार रूपेश पाटील, निलेश शिर्के, मजिद पठाण, स्वप्निल धनावडे, माज सवाल, ज्योती सुनीलकुमार, नितीन कोलटकर, जितू साळुंखे, मयुर पायगुडे आदी उपस्थित होते.

# श्रीवर्धन समुद्रकिनारी घोडागाडी व सॅण्ड बाईक मालकांमध्ये हाणामारी

**श्रीवर्धन : बातमीदार, प्रतिनिधी**



श्रीवर्धन समुद्रकिनारी घोडागाडीचालक आणि सॅण्ड बाईक चालक यांच्यामध्ये काही क्षुल्लक कारणावरून फ्री स्टाईल हाणामारी झाली. या हाणामारीत चाबूक व काठ्या यांचा सर्रासप्रमाणे वापर करण्यात आला.

यात काही व्यावसायिकांना काही प्रमाणात दुखापतीदेखील झाल्या होत्या. त्यानंतर श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये हे प्रकरण गेल्यानंतर गुन्हे दाखल करण्यात आले, परंतु या प्रकरणानंतर काही व्हॉट्सअ‍ॅप मेसेजवरदेखील जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. पोलिसांनी सर्व व्यावसायिकांना आपले धंदे बंद ठेवण्याचे आदेश आहेत, मात्र शनिवार व रविवार श्रीवर्धन येथे पर्यटकांची खूप मोठ्या प्रमाणात गर्दी होती तसेच ही गर्दी असतानादेखील आपले धंदे बंद राहिल्यामुळे अनेक व्यवसायिकांनी आपला मोर्चा आरावी समुद्रकिनाऱ्याकडे वळवल्याचे पहायला मिळाले.

समुद्रकिनाऱ्यावर हा व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांबरोबरच किनाऱ्याच्या बाहेर अनेक खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावणार देखील विक्रेते आहेत. श्रीवर्धन येथे वॉटर स्पोर्ट्स व इतर गेम बंद असल्यामुळे अनेक पर्यटकांनी आरावी बीच गाठणे पसंत केले. त्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनारी असणाऱ्या स्टॉलधारकांचेदेखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. ज्या व्यवसायिकांना समुद्रकिनारी धंदा करावयाचा आहे त्यांनी आपापल्या संबंधित विभागाचे परवाने घेऊन धंदा करावा व आपापसात कोणत्याही प्रकारे वाद विवाद करू नये, जेणेकरून कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न या ठिकाणी निर्माण होईल.

श्रीवर्धन समुद्रकिनारी पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांचा हिरमोड झाल्यामुळे पर्यटकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. प्रशासनाने यावर योग्य तो तोडगा काढून श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील वॉटर स्पोर्ट्स तसेच घोडागाडी व बाईक राईड हे व्यवसाय सुरू करावेत, अशी मागणी व्यावसायिकांमधून केली जात आहे.

# खोपोलीत वाहनतळामध्ये कारची काच फोडून १७ हजारांचा माल चोरला

**खोपोली :** शहरातील बागेश्री हॉटेलच्या वाहनतळात उभ्या असलेल्या कारची काच फोडून १७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना रविवारी रात्री घडली आहे. मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या बागेश्री हॉटेल च्या वाहनतळात ऊभी असलेली कार (एमएच ४६- एक्स ४६८४) मधुन, अज्ञात चोरट्याने कारचे उजवे बाजुकडील पाठीमागील काच फोडुन कारचा दरवाजा उघडुन कारमधील मोबाईल, स्मार्ट वॉच व रोख रक्कम असा एकूण १७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल तसेच आधारकार्ड पॅनकार्ड चोरट्यांनी चोरून नेला. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई रोहिदास भोर हे करीत आहेत.

# कोस्ते खुर्द केंद्राच्या क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**



कोस्ते खुर्द केंद्राच्या केंद्रस्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा रा.जि.प.केंद्रीय शाळा कोस्ते खुर्द येथे अतिशय उत्साहात पार पडल्या.

उद्घाटनावेळी सरपंच संचिता मोरे, केंद्रप्रमुख संजय पालांडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सत्वे मॅडम आदी उपस्थित होते. प्रास्ताविक केंद्राचे संजय पालांडे यांनी केले. सूत्रसंचालन मधुरा पालांडे यांनी केले. या वेळी शाळा व्यवस्थापन समिती शिक्षण तज्ञ मंगेश खराडे यांनी प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. मंगेश पाटेकर, महेंद्र बेटकर, पद्मानंद आमोणकर, सुनील मोरे, श्रावणी चोरगे अशोक गायकवाड यांनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

केंद्र शाळेचे मुख्याध्यापक जितेंद्र सावंत, प्रकाश मानकर, यांनी वातावरण निर्मितीकरिता विशेष प्रयत्न केले. कोस्ते खुर्द गावातील ग्रामस्थ मारुती पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अर्चना शेळके व संदेश तांबडे यांनी आभार मानले.

## धाटाव येथे श्री दत्त जन्मोत्सव

**रोहे :** तालुक्यातील प्रसिद्ध असलेल्या धाटाव येथील रोहा कोलाड मार्गावरील बापू लिंबोरे यांच्या येथील श्री दत्त मंदिरात शनिवारी श्री दत्त जन्मोत्सव आयोजित करण्यात आला आहे. श्री दत्त जन्मोत्सव निमित्ताने विविध धार्मिक, अध्यात्मिक, भजन, कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री दत्त जन्मोत्सवानिमित्ताने श्री सत्यनारायणाची पूजा आयोजित करण्यात आले आहे. भाविकांनी तीर्थप्रसाद व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन बापूसाहेब नारायण लिंबोरे व रंजना बापूसाहेब लिंबोरे यांनी केले आहे.

# कर्जतमध्ये तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचा शुभारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यातील यावर्षीचे पहिले विज्ञान प्रदर्शनाला कर्जत तालुक्यात सुरुवात झाली. या विज्ञान प्रदर्शनात १६२ प्रतिकृती मांडण्यात आल्या आहेत. नेरळ येथील एलएईएस शाळेत आयोजित करण्यात आलेले ५२वे विज्ञान प्रदर्शन दोन दिवस सर्वांसाठी खुले असणार आहे.

शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयावर कर्जत पंचायत समिती शिक्षण मंडळ आणि तालुका विज्ञान गणित अध्यापक मंडळ तसेच एलएईएस शाळा यांच्या माध्यमातून ५२वे विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन १२ आणि १३ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. कर्जत तालुका विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन कर्जत पंचायत समितीचे माजी उपसभापती मनोहर थोरवे यांचे हस्ते झाले.

या वेळी कर्जत पंचायत समिती गटविकास अधिकारी सुशांत पाटील, एलएईएस शाळेच्या संचालिका संगीता नायर, नेरळच्या माजी सरपंच उषा पारधी, तालुका शिक्षण अधिकारी संतोष दोंड, जिल्हा शिक्षण समितीचे सदस्य राजेंद्र फुलवरे, प्राथमिक शिक्षक पतपेढी अध्यक्ष भगवान घरत, दीपक थोरात, अनिल गलगले, राजेंद्र सोनावणे, सात्विक बोरसे, सुरेश पवार, ज्ञानेश्वर वाडीले, नितीन थोरात, अनुपमा चौधरी आदी उपस्थित होते.

विज्ञान प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या प्रतिकृती यांचे परीक्षण करणेसाठी परीक्षक म्हणून माध्यमिक विभागात दीपक थोरात, एस.आर. जाधव, विनयकुमार सोनवले, उल्हास गावंड यांनी काम पाहिले. तर प्राथमिक विभागात धनश्री गडकरी, एस. एस. कोंडावले, सविता यमाजी आणि सुखदा मेहेंदळे यांनी काम पाहिले.


## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
### ता. पनवेल, जि. रायगड
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**नोव्हेंबर २०२४**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुनिल विठ्ठल नागप/ साक्षी सुनिल नागप | नारायण गणपत सावंत/ सायली नारायण सावंत | पवल-१-६९४१-२०२४ | १०/०९/२०२४ | सदनिका क्र. २०१, ए विंग, दुसरा मजला, गिरीजा रेसिडेन्सी को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| २ | मोहन कृष्णा देऊळकर/ पूर्णिमा मोहन देऊळकर | मिलिंद प्रभाकर देऊळकर | पवल-१-६८१३-२०२४ | ०४/०९/२०२४ | सदनिका क्र.१०१, पहिला मजला, ई विंग, कार्तिक्या गार्डन को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ३ | अनिश चंद्रन | के.पी. चंद्रन वनजा चंद्रन तर्फे शोभा चद्रन | पवल-१-५७३२-२०२४ | २५/०७/२०२४ | सदनिका क्र ४, पहिला मजला, बि.नं. बी३, ई विंग, नंदकिशोर को.हौ.सो., वृंदावन कॉम्प्लेक्स, मौजे पालीदेवद |
| ४ | संदीप कचेर पाटील | योगेश्वर रविंद्र झुरे | पवल-२-७६०२-२०२४ | १५/०४/२०२४ | सदनिका क्र. १०७, पहिला मजला, ए विंग, प्रयाग आंगण को.हौ.सो.मौजे शिलोत्तर रायचूर |
| ५ | अर्चना अशोक साळसकर | योगेश विश्वास पाटील | पवल-१-७७६७-२०२४ | १७/१०/२०२४ | सदनिका क्र. १५०७, पंधरावा मजला, आय विंग, फेज १, बालाजी सिम्फोनी को.हौ. सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ६ | अरुण दिनकर माने | लक्ष्मीबाई मारुती दहिभाते मयत तर्फे वारस बंडू मारुती दहिभाते | पवल-१-७०५०-२०२४ | १७/०९/२०२४ | सदनिका क्र.१:४, पहिला मजला, डी विंग, बि.नं. ३ व ४, अजिंक्यतारा को.हौ.सो., वृंदावन रेसिडेन्सीयल कॉम्प्लेक्स मौजे पालीदेवद. |
| ७ | विकास प्रकाश अभंग | प्रियंका प्रितम अजगावकर/ मिथुन मनोहर गुरव | पवल-४-१९०२८-२०२४ | ३१/१०/२०२४ | सदनिका क्र.२८०७, अठ्ठाविसावा मजला, के विंग, बालाजी सिम्फोनी,मौजे शिलोत्तर रायचूर |
| ८ | गीता दिपक हर्णेकर/ दिपक विठोबा हर्णेकर | मे. राम रत्न बिल्डर्स तर्फे विनोद तुकाराम चांदे | पवल-२-१७४२९-२०२३ | ०९/१०/२०२३ | सदनिका नं. ००१, तळ मजला, बी विंग, श्री वसंतविहार को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ९ | नयना धनाजी पाटील/ धनाजी काशिनाथ पाटील | नेताजी काशिनाथ पाटील | पवल-१-७०१८-२०१८ | ०५/०७/२०१८ | सदनिका क्र. १०३, पहिला मजला, लक्ष्मी निवास, मौजे पालीदेवद |
| १० | प्रितीश प्रितम कदम/ प्रिया प्रितम कदम | सुभाष चांग्या घावटे/ दयावती सुभाष घावटे | पवल-३-२१२४४-२०२४ | १६/१०/२०२४ | सदनिका क्र. ए १०४, पहिला मजला,ए विंग, कार्तिक्य गार्डन को.हौ.सो., मौजे पालीदेवद |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(श्री. एन. जी. केणी)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**


# ‘जीवनात यशस्वी होण्यासाठी व्यक्तिमत्व विकास गरजेचा’

**चौक : प्रतिनिधी**



जीवनात यशस्वी होण्यासाठी आपल्या स्वभावात बदल करणे,भाव भावना यात संवेदनशीलता असणे आवश्यक असून लोक संग्रह करून अवगुण दूर सारून सामाजिक प्रतिमा निर्माण केल्यावर व्यक्तिमत्व विकास घडतो, असे प्रतिपादन गट शिक्षण अधिकारी कैलास चोरमले यांनी केले.

खालापूर तालुक्यातील माजगाव केंद्रस्तरीय रायगड जिल्हा परिषद आयोजित क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा वडगाव शाळा येथे झाल्या. त्याचा समारोप प्रसंगी ते बोलत होते. स्पर्धेत वडगाव शाळेने एकूण आठ स्पर्धेतील सोळा पैकी नऊ प्रथम क्रमांकावर केलं शिक्का मोर्तब केले.

या स्पर्धेत केंद्रातील एकूण नऊ शाळा व १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. केंद्रातील सर्वात जास्त बक्षिसे जिंकणारी शाळा म्हणून वडगाव शाळेने बाजी मारत क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकासात आपल्या यशाचा तुरा शिरपेचात खोचला आहे. या सर्व स्पर्धांसाठी संतोष बडे, दीपक अकोलकर, रेखा जाधव, विकास शेळके, एरवी राठोड यांनी पंच म्हणून काम केले. उद्घाटन रायगड जिल्हा परिषदेचे उपमुख्य शिक्षण अधिकारी शेवाळे, केंद्रप्रमुख परदेशी, माजी उपसरपंच महादेव गडगे, करूणा ठोंबरे, अध्यक्ष एसएमसी, राजश्री जांभुळकर, बिर्ला कार्बनचे सीआरसी प्रमुख लक्ष्मण मोरे, वडगाव शाळेचे मुख्याध्यापक सुभाष राठोड व सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

दुपार सत्रातील लगोरी या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी उपसरपंच ग्रुप ग्राम पंचायत वडगाव यांच्यात हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना या वेळी माजी सरपंच ग्रुप, ग्रामपंचायत वडगावच्या गौरी महादेव गडगे यांच्या वतीने बक्षीस म्हणून चषक तर बिर्ला कंपनीकडून प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

सूत्रसंचालन मस्तान बोरगे यांनी केले तर आभार सुभाष राठोड यांनी केले. मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्या कार्याचे कौतुक उपस्थित सर्वांनी केले.


**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

## निविदा सूचना क्रमांक ८१ सन २०२४-२५

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो. ता. महाड, जिल्हा रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५ - २२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना **दिनांक १३/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक २०/१२/२०२४ रोजी १८.०० वाजेपर्यंत** www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व **दिनांक २३/१२/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक २३/१२/२०२४ रोजी १०.०० वाजता उघडतील.** निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांनी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | माझेरी ता महाड गणेश मंदिराकडे जाणारा रस्ता तयार करणे तालुका महाड, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि.) | ८४२०५२ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | मौजे लोणेरे ता. माणगांव येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड | ८१६४६७ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथील स्टाफ क्वार्टर टाईप-२ इमारतीवर छत बांधणे, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | ८४२१३५ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | निजामपूर कोशिंबळे रस्त्यावरील ग्रा.मा. ९७ कि.मी. २/१०० मधील मोठया पुलाच्या बांधकामासाठी चाचणी रंध्रे व माती परिक्षण करणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (अनामत) | ८३९९४९ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथील स्टाफ क्वार्टर टाईप-१ इमारतीवर छत बांधणे, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | ८३९९२१ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथील स्टाफ क्वार्टर टाईप- ३ इमारतीवर छत बांधणे, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | ८०५५९९ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | हरवंदी ते वाकी रस्ता ग्रा.मा. २४२ कि.मी. २/३०० वरील मोठया पुलाची पुर्नबांधणी करणेच्या चाचणी रंध्रे व माती परिक्षण करणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ६२९५६५ | ७००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | मौजे खरवली वरची आळी येथे गटार बांधणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ४०८०७७ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| ९ | विळे पाटणूस रस्ता रा.मा. ९८ कि.मी. ७७/४०० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणेच्या चाचणी रंध्रे व माती परिक्षण करणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | २४१४९९ | ३००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग नऊ व वरील |

टिप :- १) तपशिलवार निविदा सुचना https://mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५७०४
दिनांक : १२/१२/२०२४

विमाका/कोवि/२०२४-२०२५/२३६

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
महाड (सा.बां.) विभाग, महाड

## निवडक

### मारहाणप्रकरणी तिघांवर गुन्हा

**नवी मुंबई :** उघड्या दरवाजातून घरात डोकावले म्हणून संबंधितांनी विचारणा केल्यावर उलट त्यांनाच डोकावणाऱ्या तिघांनी मारहाण केल्याची घटना नेरूळ गावात घडली आहे. यामध्ये व्यक्तीच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी नेरूळ पोलिस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस अधिक तपास करत आहेत. दिगंबर गिरी, असे या घटनेत जखमी व्यक्तीचे नाव आहे. गिरी यांच्या डोक्यावर गंभीर दुखापत होऊन ११ टाके पडले आहेत. समीर मुलाणी व त्याच्या दोन साथीदारांवर गुन्हा दाखल केला असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

### चौघांनी मारहाण करून लुटले

**पनवेल :** चार अनोळखी व्यक्तींनी लिफ्ट मागण्याचा बहाणा करून मोटरसायकल थांबवली आणि मारहाण करून मोटरसायकल, मोबाईल, रोख रक्कम आणि घड्याळ घेऊन ते पळून गेले. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात चार अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. केशव सोनवणे हे करंजाडे गाव सेक्टर ४ येथे राहत असून ते जुई गाव येथे गेले होते. त्यानंतर ते मोटरसायकलने घरी जाण्यासाठी निघाले. रात्री एकच्या सुमारास करंजाडे गावाकडील बाजूला पार्किंगजवळ खांदेश्वर रेल्वे स्टेशन जवळ ते गेले. घरी येताना चार अनोळखी व्यक्तींनी लिफ्ट मागितली. सानवणे यांनी नकार दिल्याने अनोळखी व्यक्तींनी त्यांना मारहाण करून नऊ हजार रुपये, मोबाईल, घड्याळ काढून घेतले. त्यानंतर ते सोनवणे यांच्या मोटरसायकल वर बसून तेथून पळून गेले.

# नवी मुंबईत प्लास्टिकविरोधी कारवाई तीव्र

- एक लाखांहून अधिक दंड वसुली
- ३८ किलो प्लास्टिक जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहर प्लास्टिकमुक्त करण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना राबवितांना प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिकला प्रतिबंध करण्याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. या करिता महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार विभाग कार्यालय पातळीवर पथके तयार करण्यात आली आहेत. या अनुषंगाने १० व ११ डिसेंबरला विभागीय कार्यक्षेत्रात धडाकेबाज प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमा राबविण्यात आल्या असून १ लक्ष १० हजाराहून अधिक दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे व ३८ किलो ८५० ग्रॅम प्रतिबंधात्मक प्लास्टिक माल जप्त करण्यात आलेला आहे.



यामध्ये बेलापूर विभागात पाच दुकानावर कारवाई करीत ३० हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे व सात किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आलेले आहे. अशाच प्रकारे नेरुळ विभागात १० हजार दंडात्मक रक्कम वसूली व दोन किलो ५०० ग्रॅम प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे. वाशी विभागात दोन दुकानदारांकडून १० हजार दंड वसूली व दोन किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिकचे साहित्य जप्त करण्यात आलेले आहे.

तुर्भे विभागातही तीन दुकानदारांकडे प्रतिबंधात्मक प्लास्टिक सापडल्याने आठ किलो २०० ग्रॅम एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले व १५ हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. परिमंडळ १च्या भरारी पथकानेही एक किलो एकल वापर प्लास्टिक जप्त करीत पाच हजार दंडात्मक रक्कम वसमूल केली.

यामध्ये परिमंडळ १ चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे यांच्या नियंत्रणाखाली विभागांचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी अनुक्रमे डॉ. श्रीकांत तोडकर, जयंत जावडेकर, सागर मोरे, प्रबोधन मवाडे व त्यांच्या अधिनस्त अधिकारी, कर्मचारी पथकांनी कार्यवाही केली. अशाचप्रकारे परिमंडळ २ विभागात उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमा राबविण्यात आल्या त्यामध्ये परिमंडळ २च्या भरारी पथकाने पाच हजार दंड वसूली व ७०० ग्रॅम प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त केले.

कोपरखैरणे विभागात तीन दुकानांवर कारवाई करीत १५ हजार दंड वसूली व तीन किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. घणसोली विभागात एका दुकानदाराकडून सहा किलो प्लास्टिक जप्त करुन १० हजार दंडात्मक रक्कमही वसूल करण्यात आली. ऐरोली विभागात एकात दुकानावर कारवाई करत पाच हजार दंडात्मक वसूली व ३ किलो ४५० ग्रॅम प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला.

दिघा विभागातही पाच किलो प्लास्टिक साठा जप्त करुन ५ हजार दंडात्मक रक्कम वसूल करएण्यात आली. या कारवाईमध्ये विभागांचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी अनुक्रमे सुनिल काठोळे, संजय तायडे, अंकुश जाधव, भरत धांडे व त्यांच्या विभागातील सहकारी अधिकारी, कर्मचारी यांनी पतिबंधात्मक कारवाईत सहभाग घेतला.

सलग दोन दिवस राबविण्यात आलेल्या प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमांमध्ये ३८ किलो ८५० ग्रॅम प्रतिबंधात्मक प्लास्टिक सापडले असून त्यामध्ये प्लास्टिक पिशव्यांचा मोठया प्रमाणावर समावेश असल्याचे आढळून आले आहे.

नवी मुंबईकर नागरिकांनी एकल वापर प्लास्टिकला आपल्या जीवनातून हद्दपार करावे आणि कापडी व कागदी पिशव्यांचा वापर करावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

**महापालिकेकडून जनजागृतीसह कारवाई**

आपले नवी मुंबई शहर पर्यावरणाला व मानवी जीवनाला घातक ठरणाऱ्या प्रामुख्याने एकल वापर प्लास्टिकपासून मुक्त असावे याकरिता नवी मुंबई महानगरपालिका एका बाजूने जनजागृती करीत आहे व त्यासोबतच विशेष मोहिमा राबवून प्रतिबंधात्मक प्लास्टिक आढळल्यास कारवाई करीत आहे.



पनवेल : एकादशीनिमित्त मोरबे येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात भाजप नेते एकनाथ देशेकर यांनी दर्शन घेतले. या वेळी रवींद्र पाटील, सुनील साठे, भगवान कडू, श्रीधर जोशी आदी उपस्थित होते.

# खारघरमधील बंद ई-टॉयलेट कार्यान्वित करण्याची मागणी

- भाजपकडून पनवेल मनपा आयुक्तांना निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर शहरातील बंद असलेल्या ई-टॉयलेटसंदर्भात भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल व खारघर मंडल माजी उपाध्यक्ष दिलीप जाधव यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे निवेदन दिले आहे. यामध्ये त्यांनी हे ई-टॉयलेट कार्यान्वित करण्याची मागणी केली आहे.

पटेल यांनी निवेदनात म्हटले आहे की, संपूर्ण खारघरवासियांच्या वतीने आम्ही आपणास निवेदित करू इच्छितो की, खारघरमध्ये विविध ठिकाणी गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये अनेक ई-टॉयलेट सुविधा पुरवण्याचा प्रयत्न महानगरपालिकेने केला आहे. या टॉयलेटपैकी जवळजवळ सर्वच बंद असल्याचे लक्षात आले आहे. हे ई-टॉयलेट का बंद आहेत याची चौकशी करून ते लवकरात लवकर कार्यान्वित करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना आपण द्यावेत. पुढील पंधरा दिवसांमध्ये हे ई-टायलेट चालू करावेत.

सात दिवसानंतर आम्ही आपली परत भेट घेऊन याबाबत काय प्रगती झाली? याचा आढावा घेऊ. आपण आमच्या या योग्य मागणीचा विचार करून हे ई-टॉयलेट पंधरा दिवसांच्या आत कार्यान्वित करावे.





पनवेल : विधानसभा निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर हे सलग चौथ्यांदा भरघोस मतांनी विजयी झाले आहेत. या विजयाचे शिल्पकार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे बुधवारी ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी अभिनंदन केले.

# कोळीवाड्यातील कोळी बांधवांची घरे, जागा कायमस्वरूपी करण्याची मागणी

## आमदार मंदा म्हात्रे यांचा पाठपुरावा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईसह महाराष्ट्रातील कोळीवाड्यातील कोळीराजाची घरे कायमस्वरूपी व्हावीत यासाठी बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी आता सरकार दरबारी पाठपुरावा सुरू केला आहे.

छत्रपती शिवरायांच्या आरमारात स्थान असलेला, कोळीराजा आज आपल्याच घरात उपरा झाला आहे. एकीकडे राज्यातील २०११ पर्यंतच्या झोपड्यांना अधिकृत दर्जा मिळाला पण शेकडो वर्षे असलेला कोळी पुनर्विकासाचा प्रश्न आजही जैसे थे आहे. कोळी बांधवांची घरे व जागा कायमस्वरूपी नसल्याने घरांची पुनर्बांधणी करतांना त्या घरांवर संबंधित प्रशासन मार्फत तोडक कारवाई केली जाते. त्यामुळे घरांची पुनर्बांधणी करतांना नाहक त्रास होत असल्याचे लक्षात येताच आमदार मंदा म्हात्रे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना कोळी बांधवांची घरे व जागा कायमस्वरूपी करावी, अशी पत्राद्वारे मागणी केली आहे.





या संदर्भात आमदार मंदा म्हात्रे यांनी गौरव निवासस्थानी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. नवी मुंबईसह राज्यातील कोळी बांधव प्रतिनिधी व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक लावून सदर बाबत नियमावलीच्या कायद्याच्या चौकटीत बसवून किचकट नियमांमधून सुटका करत सदरचा प्रश्न कसा मार्गी लावता येईल व कोळी बांधवांना कसा योग्य तो न्याय देण्यात येईल याकडे प्रामुख्याने लक्ष केंद्रित करणार असल्याचे म्हात्रे यांनी सांगितले.

सदर विषयी मार्गी लावून स्थानिक कोळी बांधवांना त्यांची हक्काची घरे मिळवून देण्याचा मानस आमदार मंदा म्हात्रे यांनी बोलून त्या दृष्टीने सकारात्मक पाऊले उचलली आहेत. त्याचा दिलासा संपूर्ण महाराष्ट्रातील कोळीवाड्यातील कोळीबांधवांना मिळणार आहे.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत माजी जिल्हाध्यक्ष सी.व्ही. रेड्डी, माजी नगरसेवक दीपक पवार, माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, माजी नगरसेवक, राजू शिंदे, विकास सोरटे, दत्ता घंगाळे, चिंतामण बेल्हेकर, राजू तिकोने, पांडुरंग आमले, सुरेश अहिवले, दर्शन भारद्वाज, जयवंत तांडेल, मंगेश चव्हाण, प्रवीण भगत, प्रवीण चिकणे, नाना शिंदे, सुधीर जाधव, पंकज पाचपुते, कैलास तरकसे, सुहासिनी नायडू, अश्विनी घंगाळे तसेच नागरिक उपस्थित होते.

# वेश्वी येथे स्वच्छता मोहीम

**उरण : बातमीदार**

पर्यावरणाचे, निसर्गाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या 'बहराई फाउंडेशन' या सामाजिक संस्थेतर्फे उरण तालुक्यातील 'श्री एकवीरा देवी मंदिर, वेश्वी' येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

काही दिवसांपूर्वी तिथे पक्षी निरिक्षणासाठी गेलेल्या बहराईच्या सदस्यांनी तिथला कचरा पाहिला. मंदिराच्या सभोवताली प्लास्टिक सोबत दारूच्या बाटल्यांचा अक्षरशः विळखा होता. त्याचवेळी तिथे स्वच्छता करण्याची गरज असल्याचे लक्षात आले. या ठिकाणी अगदी पायथ्या पासून ते वर मंदिरापर्यंत आणि मंदिरापासून पुढे रानात घेऊन जाणाऱ्या तिथल्या दोन पायवाटा, हा संपूर्ण परिसर पक्षी निरिक्षणासाठी उत्तम आणि नैसर्गिक दृष्ट्या समृद्ध असा आहे. त्यामुळे अशा ठिकाणी स्वच्छता व शांतता टिकून ठेवणं ही सर्वांचीच जबाबदारी आहे, अशी भावना बहराईच्या सदस्यांनी व्यक्त केली.



> **माणूस श्रद्धेने आपल्या मनःशांतीसाठी किंवा निवांतपणासाठी अशा पवित्र ठिकाणी गेल्यावर तिथे कचरा करून परतणार असेल तर अशा समाजाला प्रबोधनसोबतच आत्मपरीक्षणाची देखील नितांत गरज आहे.**
> **-वैभव पाटील**
> **सचिव, बहराई फाउंडेशन**

सकाळी ७ वाजल्यापासून १२ वाजेपर्यंत म्हणजे साधारण पाच तास चाललेल्या स्वच्छते दरम्यान, तिथून जमा केलेल्या कचऱ्यात प्लास्टिक आणि दारूच्या बाटल्यांच प्रमाण खूप अधिक होतं. हे विदारक चित्र समाजाची बिघडलेली मानसिकता दर्शविणारे आहे. त्यामुळे अशा उपक्रमातून समाजाची जनजागृती करणे खूपच गरजेचे आहे. श्री एकविरा मंदिर वेश्वि किंवा अशा कोणत्याही ठिकाणी आनंद अनुभवण्यासाठी जाताना आपलं निसर्गभान जागृत ठेवून, तिथल्या नैसर्गिक सौंदर्याला आपल्याकडून कोणतीही बाधा होणार नाही याची काळजी आपण प्रत्येकाने घेतली पाहिजे, हाच संदेश 'बहराई फाउंडेशन'ने आपल्या कृतीतून समाजाला देण्याचा प्रयत्न केला आहे.

या वेळी श्रमदान करण्यासाठी बहाराई फाउंडेशनचे सदस्य, अंकिता ठाकूर, रामनाथ पाटील, महेश पालकर, विशाल ठाकूर, दौलत पाटील, तुषार पाटील यांच्यासोबत बहराई फाउंडेशनचे कोषाध्यक्ष सुरेंद्र पाटील व सचिव वैभव पाटील हे सहभागी होते.

## शिर्डी पदयात्रा



पनवेल : जय बजरंग मित्र मंडळाचे अध्यक्ष विनोद वाघमारे व माजी नगरसेविका वृषाली जितेंद्र वाघमारे यांच्या पुढाकाराने जय बजरंग मित्र मंडळामार्फत नवीन पनवेल ते शिर्डी पदयात्रा काढण्यात आली.

# कामोठ्यात रस्त्यालगत संरक्षक जाळी बसविण्याची मागणी

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील कामोठे येथील सेक्टर ३६ समोरील शिवसेना शाखा ते भूमी टॉवर या दरम्यानचा रस्त्यालगत संरक्षक जाळी बसविण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी पनवेल मनपा आयुक्तांना निवेदन दिले आहे.

डॉ. भगत यांनी निवेदनात म्हटले आहे की, पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे येथील से-३६ समोरील शिवसेना शाखा ते भूमी टॉवर या दरम्यानच्या रस्त्यावर सकाळी चालण्याकरीता व व्यायाम करण्याकरीता अनेक नागरिक येत असतात. या रस्त्याच्या पलीकडील बाजुला संरक्षक जाळी नसल्याकारणाने अनेकदा या ठिकाणी कचरा टाकला जातो व त्यामुळे नागरिकांना सदरील रस्तयावरुन चालताना गैरसोयीस सामोरे जावे लागते व यामुळे या भागाचे विद्रुपीकरणही होते त्यामुळे सदरील रस्त्यालगत संरक्षक जाळी (Railing) लावल्यास त्याठिकाणी कचरा टाकला जाणार नाही व नागरिकांना जी गैरसोय भेडसावत आहे ती भेडसावणार नाही.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील कामोठे येथील सेक्टर ३६ समोरील शिवसेना शाखा ते भूमी टॉवर या दरम्यानचा रस्त्यालगत संरक्षक जाळी बसवण्यात यावी.



# उमरोलीच्या सरपंचपदी भाजपच्या श्वेता माळी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत उमरोलीच्या सरपंचपदी भाजपच्या श्वेता हनुमान माळी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

श्वेता हनुमान माळी (वय २८) यांची बुधवारी (दि.११) ग्रुप ग्रामपंचायत उमरोली येथे बिनविरोध सरपंचपदी निवड झाली. या निवडीबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे. या वेळी माजी सरपंच शांताराम दा. पोपेटा, रोशन पोपेटा, दीपक पाटील, किरण डांगरकर, प्रितेश डांगरकर, प्रकाश तांडेल, बळीराम मढवी, नारायण माळी, नरेश मढवी, हनुमान माळी, निखिल मढवी, संजय मढवी, विष्णू मढवी, किरण माळी उपस्थित होते.

# खालापूरच्या पाणीपुरवठ्यात चोरट्यांचे विघ्न

## विद्युत केबल वारंवार चोरीला; नागरिकांसह कर्मचारीही हैराण

**खोपोली : प्रतिनिधी**

आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास अशी परिस्थिती खालापूर पाणीपुरवठा यंत्रणेची झाली असून अनियमित पाणीपुरवठ्याने हैराण खालापूर नागरिकांचा त्रास चोरट्यांनी अधिकच वाढवला आहे.

खालापूर नगरपंचायत शहराला पाणीपुरवठा यंत्रणा कलोते धरणाजवळील पाझर विहीरवर आहे. कलोते ते खालापूर हद्दीत जलवाहिनीला लागलेल्या गळतीमुळे या ठिकाणाहून होणारा पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. खालापूर शहरासाठी पर्यायी पेयजल योजना सावरोली पुलानजीक पाताळगंगा नदीवर सध्या कार्यान्वित आहे. याठिकाणी अत्यंत दूषित, आणि उग्र वास असलेले पाणी नदीला



असून नाईलाजास्तव नागरिकांना पाणी वापरावे लागत आहे. हा पाणीपुरवठादेखील नियमित नसून दोन ते तीन दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. त्यात आता भर चोरट्यांचा पडली आहे.

सावरोली पुलाजवळ नदीकिनारी निर्जन जागी पंपहाऊस असल्याचा फायदा चोरट्यांनी घेतला असून तीस मीटरची विद्युत केबल चोरट्यांनी चोरून नेली आहे. चोरट्यांनी या अगोदरही तीन वेळा चोरट्यांनी केबल चोरुन नेली असून नगरपंचायत पाणीपुरवठा कर्मचारीदेखील चोरटचाला वैतागले आहेत.

वारंवार केबल चोरीला जाऊनही नगरपंचायतीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल न केल्याने चोरट्यांचे फावले असून भरमसाठ दराने केबल खरेदीमुळे नक्की काय गौडबंगाल आहे याच खालापूर नागरिकांना पडला आहे. नगरपंचायत अभियंता देवेंद्र मोरखंडीकर यांना केबल चोरीची तक्रारबाबत विचारणा केली असता ते सुट्टीवर असल्याने सहकारी अधिकाऱ्यांना तक्रार करण्याबाबत सूचना दिल्या असल्याचे सांगितले.

> **अनियमित पाणीपुरवठा आणि कोणत्या वेळेला पाणी सोडणार हे निश्चित नसते. कधी पहाटे, तर कधी रात्री कोणत्याही वेळेला पाणी येत असून पूर्वकल्पना देत नसल्याने अनेकदा गरजेकरता पाणी मिळत नाही. नगरपंचायत अधिकारीवर्ग खालापूर शहरात राहत नसल्याने पाणीटंचाईच्या झळा त्यांना सोसाव्या लागत नसल्याने खालापूरकर नागरिकांच्या व्यथा कळणार नाहीत.**
> **–सुजाता गायकवाड, गृहिणी**

# पालीतील वाढीव मालमत्ता कर रद्द करण्यासाठी नागरिकांनी दिले निवेदन

**पाली : प्रतिनिधी**

पाली नगरपंचायतीतर्फे मालमत्ता करवाढीच्या नोटीस बजावल्या गेल्यामुळे नागरिक आक्रमक झाले आहेत. याच्या विरोधात पालीतील आगरी समाज आगर आळीतर्फे बुधवारी (दि. ११) नगरपंचायतीमध्ये जाऊन मुख्याधिकाऱ्यांना करवाढ रद्द करण्यासाठी निवेदन देण्यात आले.



या वेळी पाली आगरी समाज अध्यक्ष ललित सुरेश ठोंबरे, माजी अध्यक्ष दिलीप मढवी, माजी सरपंच दिनकर काटकर, महेश खंडागळे, अनंत काटकर, आगरी समाज महिला अध्यक्ष रंजना मढवी, उपाध्यक्ष संजीवनी काटकर, श्रीकांत ठोंबरे, हनुमान जोशी, शरद ठोंबरे, दत्तात्रय काटकर, दिलीप खंडागळे, गोरखनाथ माळी, मिलिंद थळे, सोनाली मढवी, सुशीला मिसाळ, दिपाली मिसाळ, महेश खंडागळे, अनंत काटकर, विनायक फोडे, सीताराम जोशी, दीपक थळे, विशाल परदेशी, राजा थळे, तुकाराम फोंडे, चंद्रकांत काटकर, सुजाता खंडागळे, अस्मिता घरत, सुप्रिया काटकर, प्रतिभा मढवी, सुनीता ठोंबरे, रेश्मा काटकर, मयुरी काटकर, रूपाली मिसाळ, राजेश्री काटकर, मंजुश्री ठोंबरे, शकुंतला ठोबरे, पल्लवी फोंडे, मनीषा म्हात्रे, राकेश मढवी, ओंकार भगत, दीपक फोंडे, प्रदीप खंडागळे, महेश काटकर, योगेश खंडागळे, मुकेश काटकर, शंकर भोईर, निखील काटकर, किरण थळे, संकेत खंडागळे, महेश भगत, संतोष थळे, शुभम काटकर, स्वरूप मढवी, गौरव काटकर, शौनक काटकर, दीपक म्हात्रे, दीपक जोशी, सुरेश काटकर, लहू जोशी आदींसह महिला, तरुण व नागरिक उपस्थित होते.

# उंबरे दुर्घटनेतील कंपनी मालकावर गुन्हा दाखल

## भाजपची मागणी; अन्यथा तहसील कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील उंबरे गावाजवळील समराज कंपनीकडून मातीचा भराव सुरू आहे. या ठिकाणची संरक्षण भिंत कोसळली असून काम करणारे सहा कामगार जखमी झाले झाल्याची घटना नुकतीच घडली. जखमी कामगारांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर उपचारादरम्यान दोन कामगारांचा मृत्यू झाला. याबाबत भाजप आक्रमक झाला असून पक्षाचे विधानसभा युवा मोर्चा अध्यक्ष प्रसाद पाटील यांनी प्रशासनाला निवेदन देत कंपनी मालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल अशी मागणी केली असून जर मालकावर गुन्हा दाखल झाला



नाही, तर भाजप पुढील काळात तीव्र आंदोलन करण्याचा असा इशाराही दिला आहे.

या संदर्भात प्रसाद पाटील यांनी प्रशासनाला निवेदन देताना म्हटले की, उंबरे या ठिकाणच्या समराज कंपनी येथे ५ डिसेंबर रोजी एक मोठी दुर्घटना घडली असून कंपनीचे काम करणाऱ्या दोन कामगारांचा मातीच्या ढिगाऱ्याखाली दबून मृत्यू झाला आहे तसेच चार कामगार गंभीर जखमी झाले आहेत. कंपनीने केलेला मातीचा भराव व केलेले उत्खनन हे अवैध असून कंपनीने अतिशय थोड्या प्रमाणात रॉयल्टी भरून मोठ्या प्रमाणात उत्खनन व भराव करून शासनाचा कोट्यवधी करोडो रुपयांचा कर बुडवून स्वतःच्या फायद्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल करून पर्यावरणाचाही ऱ्हास करण्याचे काम केले आहे. कंपनीने केलेले हे बांधकाम कोणतेच आर्कीटेक्चर प्लॅन न घेता केल्याचे दुर्घटनेमुळे समोर आले आहे.

कामाच्या ठिकाणची स्थिती पाहता या दुर्घटनेला कंपनी मालक जबाबदार असून त्यांच्यावर निष्पाप कामगारांचा बळी घेतल्याप्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा; अन्यथा भाजप खालापूरतर्फे तहसील कार्यालय येथे धरणे आंदोलन करण्यात येईल व त्यास प्रशासन पूर्णपणे जबाबदार असेल, असा इशारा प्रसाद पाटील यांनी निवेदनातून प्रशासनाला दिला आहे.

# सुशिक्षित बेरोजगारांच्या सेवा सोसायटीमार्फत कंत्राटी पद्धतीने पदभरती; अर्जांचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायट्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने तीन लाख रुपयेपर्यंत इतक्या रकमेची कामे विनानिविदा उपलब्ध करून देण्यासाठी रोजगार व स्वयंरोजगार विभाग जिल्हा स्तरावर काम वाटप समितीची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यामध्ये विविध कंत्राटी पदे सुशिक्षित बेरोजगारांच्या सेवा सोसायटीमार्फत कंत्राटी पद्धतीने भरावयाची आहेत.

यामध्ये जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड–अलिबाग (खनिकर्म शाखा) लिपिक, पदसंख्या १ व शिपाईकम वाहनचालक १ अलिबाग–रायगड, कालावधी ११ महिने, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड–अलिबाग शिपाई पदसंख्या १, अलिबाग–रायगड तसेच अ.क्र.०२ येथील कार्यालयाकरिता बेरोजगारांच्या सेवा सोसायटी मार्फत कंत्राटी सेवेकरीता पदवीधर अंशकालीन उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

ज्या सेवा सोसायटयांचे कार्यक्षेत्र अलिबाग तालुक्याकरिता आहे अशा सेवा सोसायट्यांना कामाची आवश्यकता असल्यास उपरोक्त कंत्राटी काम मिळणेबाबतचे आपले प्रस्ताव १६ डिसेंबरपर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड–अलिबाग या कार्यालयात स्वहस्ते सादर करावे. आवश्यक अटी व शर्तींची पूर्तता करणे अनिवार्य आहे. उशिरा प्राप्त झालेले तसेच अपूर्ण स्वरूपातील प्रस्ताव अपात्र ठरवून स्वीकारण्यात येणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी, अधिक माहितीस्तव या कार्यालयास प्रत्यक्ष संपर्क साधावा अथवा कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२१४१–२२२०२९वर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त, अ.मु. पवार, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड–अलिबाग यांनी केले आहे.

# वालेकरांकडून जिल्हाधिकाऱ्यांना पुस्तक भेट

**नागोठणे : प्रतिनिधी**

रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांची ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर यांनी त्यांच्या दालनात सदिच्छा भेट घेतली व बळवंत मी, यशवंत मी या पुस्तकाची प्रत त्यांना सादर केली.

पुस्तकाची प्रत चाळल्यानंतर आपण अध्यापनाचे काम करीत असताना पत्रकारितेत प्रवेश केलात. पत्रकारिता करताना अनेक सामाजिक प्रश्न हाताळलेत व त्यात यशस्वी झालात. त्यातूनच बळवंत मी, यशवंत मी या पुस्तकाची निर्मिती झाली. आत्मकथनपर पुस्तक लिहिल्याबाबत आपले अभिनंदन, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी म्हटले.

# श्रमदानासाठी विद्यार्थ्यांचा पुढाकार

## रोह्यातील कळसगिरीचा पायथा केला चकाचक

**धाटाव : प्रतिनिधी**

आतापर्यंत शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या श्रमदान उपक्रमातून बंधारा बांधणे, गावाची साफसफाई केली जाते, मात्र प्रथमच डॉ. चिंतामणराव देशमुख व सौ. कुसुमताई ताम्हाणे महाविद्यालयात जिल्ह्यातील महाविद्यालयांतून आलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी कळसगिरीचा पायथा, संकल्पित रस्ता रंग बेरंगी करून अक्षरशः चकाचक केला. त्यामुळे निसर्गरम्य कळसगिरी जंगलाला आगळीच झळाली आली. तब्बल ७०हून अधिक विद्यार्थ्यांनी श्रमदानासाठी पुढाकार घेतला.

राष्ट्रीय सेवा योजनेतील सहभागी विद्यार्थ्यांनी बुधवारी (दि. ११) सकाळी ७ ते ९च्या वेळेत कळसगिरी जंगलाच्या पायथ्याशी असलेली काटेरी झुडपे साफ केली. नवीन लावलेल्या झाडांना सुरक्षित केले. प्राचीन तलाव सभोवताली रस्ता मोकळा करून पर्यटनस्थळ प्रेक्षणीय केले. श्रमदानातून विद्यार्थ्यांनी साफसफाई करत अधिक उत्साह दाखवला. शाहीर नितीन सोलंकी यांनी कळसगिरी शीर्षक गीत, विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे गाणी गात, छत्रपती शिवाजी महाराज की जय, हरहर महादेव, जय जवान जय किसान असा जयघोष केला. जणू काही अवघा कळसगिरी निसर्गमय झाला.

सिटी फ्लॉवर्सच्या कळसगिरी कायम निसर्गरम्य ठेवण्याला, रंगीत फुलांचे शहर उपक्रमाला अधिक गती मिळाली. दरम्यान, राष्ट्रीय सेवा योजनेतील सहभागी विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून जंगल सेफ है असा संदेश देण्यात आला, तर आधी भव्य चित्रकला स्पर्धा, आता विद्यार्थी श्रमदानातून लहानगे व तरुणांना निसर्गाची आवड निर्माण करण्याचा उद्देश सफल होत असल्याने सर्वत्र कौतुक होत आहे

प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी कळसगिरी जंगल पायवाट सफाई, तलाव सुशोभीकरण विद्यार्थी श्रमदान उपक्रमाला भेट दिली. प्राचीन तलाव त्याच ढाचेत सुशोभीकरण करण्यासाठी कळसगिरी पर्यटन करण्यासाठी आपण शासन, लोकसहभागातून निश्चित प्रयत्न करू, असे खुटवड यांनी आश्वासित केले. श्रमदान उपक्रमातून मुलांचा पहाटेचा आनंद वृद्धींगत झाला. सिटी ऑफ फ्लॉवर्सचे प्रमुख सुरेंद्र निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक राजेंद्र जाधव, सल्लागार हेमंत ओक व परिवारातील सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. प्राचार्य अतुल साळुंखे, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. तुळशीदास मोकल यांनी श्रमदान शिबिराला उत्तम मार्गदर्शन केले.

महिलांनी चुल्यावर बनवलेल्या गरमागरम कांदापोहे, गुळाची चहाचा आस्वाद विद्यार्थी व मान्यवरांनी घेतला. श्रमदान उपक्रमासाठी अनेक मान्यवरांनी सहकार्य केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थ्यांनी श्रमदानात सहभाग घेऊन आम्हाला अधिक ऊर्जा दिली अशी भावना सुरेंद्र निंबाळकर यांनी व्यक्त केली.

दरम्यान, कळसगिरीच्या पायथ्याशी बुधवारची पहाट विद्यार्थी यांसह सर्वांच्या आठवणीत राहील. ही स्मृती आम्ही विसरू शकत नाही, अशी प्रतिक्रिया सहभागी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली, तर तरुण विद्यार्थ्यांच्या सहभागाने कळसगिरी चांगलाच निसर्गमय झाला, असे अधोरेखित झाले आहे.



# दत्तगुरूंच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वढाव येथील दत्त मंदिरात गुरुवारी (दि.१२) सकाळी ९ वाजता दत्तगुरूंच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना व कलश पूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

चाळीस वर्षांपूर्वी या दत्त मंदिराचे बांधकाम झाले होते. या वर्षी मंदिराचे नूतनीकरण पूर्ण झाले असून यानिमित्त १२ डिसेंबरला रात्री ९ वाजता श्री हनुमान प्रासादिक महाजन मंडळ बेनवले यांचे संगीत भजन होणार आहे. १३ डिसेंबरला सकाळी ९ वाजता ज्ञानेश्वरी वाचन, संध्याकाळी ४ वाजता सत्यनारायणाची महापूजा, ७ वाजता तुळजाभवानी संगीत भजन मंडळाचे भजन, रात्री ९ वाजता हभप श्रेयस मंदार व्यास डोंबिवली यांचे कीर्तन आहे.

१४ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता दत्तगुरूंच्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त हभप श्रेयस व्यास यांचेच कीर्तन होणार असून रात्री ९ वाजता पेण–दिवा रेल्वे प्रवासी संघटनेचे नंदकुमार ठाकूरबुवा यांचे संगीत भजन होईल. या उत्सवाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.

# आई एकवीरा ग्रुपने जपली सामाजिक बांधिलकी

## विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोफत वायफाय सुविधा, वृक्षांना संरक्षण कवच



**धाटाव : प्रतिनिधी**

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या मदत व्हावी या उद्देशाने आई एकवीरा ग्रुपने रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळाघर या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वायफाय सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्याचप्रमाणे तळाघर–बोरघर कालवा रोडलगत लावलेल्या वृक्षांना जाळी लावून त्यांना जोपासण्याची जबाबदारी मंडळातील प्रत्येक सदस्याने दोन वृक्ष दत्तक घेतले आहेत.

सामाजिक जाणीवेतून व गावातील विद्यार्थ्यांची गरज ओळखून ही वायफाय सुविधा सुरू करण्यात आली आहे. सध्या सुरू असलेल्या स्पर्धा परीक्षा व शैक्षणिक अर्ज तसेच विविध शासकीय योजनांची माहिती सहज उपलब्ध व्हावी या उद्देशाने ही सुविधा आम्ही उपलब्ध करून दिली आहे, असे मंडळाचे अध्यक्ष पोशा कांबळे यांनी सांगितले.

या वेळी मंडळाचे उपाध्यक्ष संतोष मोरे, सेक्रेटरी मच्छिंद्र मोरे, खजिनदार मंगेश मोरे, सल्लागार सचिन मोरे, मनोज मोरे, प्रदीप मोरे, तुकाराम मोरे, मोरेश्वर मोरे, मिलिंद कांबळे, दिलीप मोंढे, अरुण खैरे, दिनेश ठाकूर, महेश मोंढे यांच्यासह शाळेतील शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# रब्बी हंगामासाठी पेरणीपूर्व मशागतीला वेग

**मुरूड : प्रतिनिधी**

यंदा मुरूड तालुक्यात सरासरीपेक्षा दमदार पाऊस झाला असून नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासूनच शेतकरी रब्बी पेरणीपूर्व मशागतीच्या कामाला लागले आहेत. समाधानकारक पावसामुळे तालुक्यात सरासरी ३७० हेक्टर क्षेत्रावर रब्बीचा पेरा होण्याची शक्यता आहे.

गेल्या आठवड्याभरापासून पहाटेच्या वेळी धुक्याची चादर व दव पडत असल्याने वातावरणात गारठा जाणवत आहे. खरिपातील भात कापणीचा हंगाम पूर्ण झाला असून शेतातच उंडे रचल्याचे, तर काही ठिकाणी भाताची मळणी सुरू असल्याचे चित्र आहे. दुसरीकडे काही शेतकऱ्यांनी भाताची कापणी केल्यानंतर ट्रॅक्टरने तसेच बैलांच्या सहाय्याने रब्बी हंगामासाठी नांगरणी सुरू आहे.

कोकणात मूग, चवळी, हरबरा, मटकी ही कडधान्ये येऊ शकतात, मात्र कडवे वालाव्यतिरिक्त इतर दुबार पीक घ्यायला शेतकरी धजत नसल्याची स्थिती आहे.



मुरूड तालुक्यात ३२०० हेक्टर भात क्षेत्र लागवड योग्य जमीन असली तरी रब्बी पिकांसाठी लागणाऱ्या कालव्याची वा विहीरींची सोय नसल्यामुळे शेतकरी वर्ग सर्वच क्षेत्रावर कडधान्य घेऊ शकत नाही.

गतवर्षी कडधान्यांपैकी कडवे वाल, हरबरा, मूग व चवळी मिळून एकूण ३५८ हेक्टर क्षेत्रावर रब्बी पीक पेरणी केली गेली होती. वालाची मागणी मोठ्या प्रमाणात असल्याने शिवाय आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह या व्यवसायावर होत असल्याने शेतकऱ्यांकडून जोडधंदा म्हणून शेतात पीक घेतले जाते. थंडीच्या दवामुळे जमीन ओलसर होते. त्या दवामुळे वाल, कलिंगड या पिकांना मोठ्या प्रमाणात पोषक द्रव्य जमिनीतून मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांना ही पीके मोठे उत्पन्न देणारी असून काही लोकांना रोजगार मिळतो.

कडधान्य तसेच कलिंगडाचे पीक मुरूड तालुक्यातील तेलवडे, शिघ्रे, आदाड, खारअंबोली, काकळघर, बोर्ली, मांडला, वाणदे, जोसरांजण, वावडुंगी व इतर गावांतून मोठ्या प्रमाणावर घेतले जाते.

> **भात पड क्षेत्रामध्ये कडधान्यांचे उत्पन्न वाढविणे या योजनेंतर्गत मूग व हरभरा प्रात्यक्षिकासाठी हेक्टरी ७५०० रुपये अनुदान असून ते निविष्ठा स्वरूपात देण्यात येते. त्याचप्रमाणे मसूर कडधान्याचे क्षेत्र वाढ करण्यासाठी मसूर बियाणे मिनीकिट देणार आहोत.**
> **–मनिषा भुजबळ,**
> **मुरूड तालुका कृषी अधिकारी**

वालाचे लागवड क्षेत्र का वाढत नाही, असे दिनेश लक्ष्मण मिणमिने या शेतकऱ्याला विचारले असता ते म्हणाले की, बियाणे, नांगरणी या खर्चापेक्षाही शेताला काटी कुंपण करताना खर्च मोठा असतो. भातशेती उलगल्यानंतर उनाड गुरांचा खूप त्रास होतो. त्यामुळे ज्यांच्या घरात शेती करणारी माणसे आहेत त्यांना परवडते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन



**खारघर : प्रतिनिधी**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील जिमखाना विभागाच्या वतीने १२ ते १४ डिसेंबरदरम्यान मुंबई विद्यापीठांतर्गत प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन महाविद्यालयाचे सीडीसी मेंबर प्रभाकर जोशी यांच्या हस्ते गुरुवारी (दि.१२) झाले.

या क्रीडा स्पर्धा घेण्याचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये सांघिक कौशल्य निर्माण व्हावे तसेच खेळाविषयी आवड निर्माण व्हावी व ते शारीरिक व मानसिक सदृढ व्हावेत हा आहे. या क्रीडा स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय विद्यार्थी वेगवेगळ्या खेळांमध्ये भाग घेणार आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने बुद्धीबळ, क्रिकेट, कबड्डी, खो-खो, धावणे, गोळाफेक, रस्सीखेच असे वेगवेगळे खेळ खेळले जाणार आहेत.

प्रभारी प्राचार्य डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना या स्पर्धांमध्ये सहभाग घेण्याचे आवाहन केले व यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. महाविद्यालयातील जिमखाना प्रमुख प्रा. प्रथमेश उदेकर, फिजिकल डायरेक्टर अजिंक्य भगत व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मेहनत घेत आहेत.












## 'आरडीसीए'च्या २३ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ



**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या (आरडीसीए) वतीने आयोजित करण्यात आलेल्या २३ वर्षाखालील मुलांच्या जिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेला नुकताच प्रारंभ झाला आहे. रायगड जिल्ह्यातील एकूण १६ नामांकित क्लब, अकॅडमीच्या संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला आहे.

स्पर्धा ४० षटकांची एकदिवसीय असून प्रथम सकाळी व नंतर बाद फेरीनुसार आयोजित करण्यात आलेली आहे. स्पर्धेत एकूण २७ एकदिवसीय सामने होणार आहेत. स्पर्धेत खेळल्या गेलेल्या सामन्यात खेळाडूंच्या कामगिरीच्या आधारावर संघाची निवड करण्यात येईल व निवडलेला संघाचे पुढे सराव सामने व शिबिराचे आयोजन आरडीसीएच्या वतीने करण्यात येणार आहे. त्यानंतर अंतिम संघाची निवड करून रायगड जिल्ह्याचा संघ महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित क्रिकेट स्पर्धेत सहभागी होईल.

जिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेतील सामने खारघर येथील बी.पी. पाटील मैदान, घरत क्रिकेट मैदान, साई सुरज मैदान, ४० प्लस गावदेवी टेंभोडे मैदान पनवेल आणि पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर होणार आहेत.

याआधी आरडीसीएतर्फे १६ व १६ वर्षाखालील मुला-मुलींच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले. गेल्या दोन महिन्यात विविध वयोगटातील क्रिकेट स्पर्धेत १००पेक्षा जास्त एकदिवसीय सामने झाल्यामुळे जिल्ह्यातील गुणवान खेळाडूंना खेळण्याची संधी व प्रोत्साहन आरडीसीएच्या वतीने देण्यात आले.

दरम्यान, याही स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंना आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व कार्यकारी मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.





वर्ष ४१ वे ॥ॐ श्री बाळकृष्णाय नमः ॥ स्थापना १९८३

मार्गशिर्ष शुद्ध (त्रयोर्दशी) ते दत्तजयंती मार्गशिर्ष शुद्धपौर्णिमा अखंड हरिनाम सप्ताह
श्री स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर

राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ भाऊसाहेब महाराज की जय ॥ राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ गिरीमल्लेश्वर महाराज की जय ॥
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ बाळकृष्ण महाराज की जय ॥ राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ दादा महाराज की जय ॥
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज की जय ॥ श्री. स.स. प्रेमचैतन्य महाराज की जय ॥
गुरु चरणी ठेवीता भाव । आपोआप भेटे देव ॥




अनंत कोटी ब्रम्हांडनायक श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज यांच्या आशिर्वादाने व स्वानंद सुखनिवासी चांगू काना ठाकूर व स्वानंद सुखनिवासी भागुबाई चांगू ठाकूर यांच्या प्रेरणेने पूनीत शिवाजीनगर माऊली मंदिरामध्ये श्री.स.स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर, यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरू चरित्रामृत ग्रंथ, श्री दासबोध ग्रंथ, एकनाथ भागवत ग्रंथाचे पारायण पर्वणी प्रारंभ मार्गशीर्ष शुध्द ॥१३॥, शके १९४६, शुक्रवार दि. १३/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. प्रारंभ ते मार्गशीर्ष शुध्द ॥१५॥ पोर्णीमा शके १९४६, रविवार दि. १५/१२/२०२४ रोजी दुपारी १२.०० वा. माऊलीवर पुष्पवृष्टी होणार आहे. सर्व भागातील गुरूबंधू, भाविक भक्तांनी उपस्थित राहून आपला देह सार्थकी लावावा. तसेच भजन, प्रवचन कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

नित्याचे कार्यक्रम

| सकाळी | सकाळी | सकाळी | सकाळी | दुपारी | दुपारी | सायंकाळी | सायंकाळी | रात्री |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ ते ०६ | ०६ ते ०९ | ०९ ते १० | १० ते १२ | १२ ते ०१ | ०२ ते ०६ | ०६ ते ०७ | ०७ ते ०८ | ०९ ते ११ |
| काकड आरती | श्रीची नित्यपुजा | संगित भजन | प्रवचन | दुपारची आरती | संगित भजन | संध्याकाळची आरती | ग्रंथ वाचन व ध्यान | भजन व किर्तन |

दैनंदिन कार्यक्रम

शुक्रवार दिनांक १३/१२/२०२४

| | |
|---|---|
| सकाळी ८.०० ते १०.०० संगीत भजन | **बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावेखाडी (उत्तरपाडा),** बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर पखवाज : आत्माराम मोकल, जयराम म्हात्रे (न्हावा) |
| सकाळी १० ते १२ - प्रवचन | **श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर** श्री. भागवत साहेब, पुणे, ह.भ.प. आप्पा पांचाळ, चिपळून श्री. रमण ठाकूर, न्हावाखाडी, श्री. अरुणशेठ ठाकूर |
| दुपारी २ ते ४ संगीत भजन | **भावभक्ति महिला भजन मंडळ, गव्हाण-खारकोपर** गायीका : सौ. रत्नप्रभा घरत, श्रीमती हिरुबाई घरत, सौ. चंद्रप्रभा घरत, सौ. आनंदी घरत श्री. गुरुकृपा प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर गायीका : सुप्रिया घरत आणि मंडळी पखवाज : तुषार घरत (चिलें उरण) |
| दुपारी ४ ते ६ संगीत भजन | **संत जनाबाई प्रासादिक भजन मंडळ** गायिका : सौ. पुनम ठाकूर, सौ. रुपम वास्कर, हर्षद फडके, पखवाज : श्री. मधुकर धोंगडे, केतन फडके |
| सायं. ८ ते ९ संगीत भजन | **दत्त प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर** बुवा : वसंतशेठ पाटील, नितीन ठाकूर (खारकोपर) पखवाज : श्री. गौरव म्हात्रे, तुकाराम कोळी (गव्हाण) |
| रात्री ९ ते ११ -किर्तन | **श्री. ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज घाटाव (रोहा)** |
| रात्री ११ नंतर | **रात्रीचे बारा अभंग** |

शनिवार दिनांक १४/१२/२०२४

| | |
|---|---|
| सकाळी ८.०० ते १०.०० संगीत भजन | **श्री. राधाकृष्ण भजन मंडळ, शिवाजीनगर** बुवा : रशिक कानडा आणि मंडळी पखवाज : कु. परितोष हातचांगे (बेलपाडा) तबला : रुतुजा कानडा |
| सकाळी १० ते १२ - प्रवचन | **श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर** श्री. भागवत साहेब (पुणे), ह.भ.प. आप्पा पांचाळ (चिपळूण) |
| दुपारी २ ते ४ | **श्री विश्वंभर भजन मंडळ, गव्हाण,** गायक : हेमंत कोळी पखवाज : प्रशांत कोळी, रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ४ ते ६ | **विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ, कोपर** गायीका : सौ. अनुसया घरत, सौ. इंदुताई म्हात्रे, सौ. नंदा पाटील, सौ. आनंदी घरत, सौ. अनिता म्हात्रे, सौ. वासंती ठाकूर. वादक : दिनेश घरत |
| रात्री ८ ते ९ संगीत भजन | **एकादशी भजन मंडळ, न्हावे** बुवा : रामनाथ पाटील आणि मंडळी |
| रात्री ९ ते ११ - किर्तन | **श्री. ह.भ.प. प्रकाश महाराज पाटील आणि मंडळ,** कुंडेवहाळ |
| रात्री ११ नंतर | **रात्रीचे बारा अभंग, जागर भजन** रमन ठाकूर, शिवाजी ठाकूर, गजानन ठाकूर, पद्माकर ठाकूर (न्हावा खाडी), पांडूरंग रसाळ, आत्माराम मोकल, पद्माकर ठाकूर (शिवाजीनगर), किसन मोकल, मधुकर ठाकूर |

रविवार दिनांक १५/१२/२०२४

| | |
|---|---|
| सकाळी ८.०० ते १०.०० संगीत भजन | **नादब्रम्ह साधना भजन मंडळ (रांजणपाडा - ओवेपेठ) देवसागर साधक समाज सामुदाईक संगित भजन** बुवा : निवृत्ती चौधरी, अक्षय चौधरी (रांजणपाडा), ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंतशेठ पाटील, गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, सुरेश ठाकूर, डॉ. निवृत्ती म्हात्रे, रामनाथ पाटील, महेश पाटील (न्हावा), भाऊ ठाकूर (शिवाजीनगर). |
| सकाळी १० ते १२ - प्रवचन | **श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर** |
| दुपारी १२ वाजता | **श्री. बाळकृष्ण माऊलीवर पुष्पवृष्टी** |

- व्यवस्थापक -
देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय), शिवाजीनगर - गव्हाण-खारकोपर न्हावे - न्हावेखाडी - (संचलित)

- संयोजक -
श्री. रामशेठ ठाकूर (मा.खासदार, रायगड), व परिवार आणि ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर

कार्यक्रमाचे स्थळ : श्री.स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर, मु. शिवाजीनगर, पो.गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. फोन नं. ९१६७९९१०४५

प्रसंगानुसार कार्यक्रमात फेरबदल करण्यात येईल । कार्यक्रमाच्या वेळेला महत्व दिला जाईल.